*abhishek m. wam=nkhade***Shri Shivaji Arts, Commerce and Science College, Akot Dist. Akola**

## *Department : Economics*

### 1.Faculties: Faculty profile :-

| S N | Name of the Faculty | Qualification | Designation |
|---|---|---|---|
| 1 | Mr. C. S. Dhoke. | M.A. M.Phill. (ECO ) | Associate Professor and Head |
| 2 | Mr. M. K. Nannaware<br>Transfer faculty | M.A. M.Phill. (ECO) SET | Assistant Professor<br>( 01/07/2013 to 20/06/2018 ) |
| 3 | Ku. S. L. Mahalle | M.A. M.Phill | CHB |
| 4 | Mr. A. B. Boche | M. A. | CHB |
| 5 | Mr. P. H. Rathi | M. A. | CHB |

### 2. Programme and its outcomes :-

**Programmes offered**

| Course | Programme |
|---|---|
| **U. G.** | **B. A.** |
| **P. G.** | **M. A.** |

**Programme outcomes**

1) Service in public sector

2) Service in private sector

3) Useful for any government administration

4)Useful for agriculture industries banking and trade and finance

### 3. Awards and Achievements of the Students

| Year | Name of the Student | Awards/Achievement |
|---|---|---|
| **2015-16** | Miss. M. R. Katore | As a Police at City Kotawali Akola. |
| | Mr. M. R. Datir | Joint as a Assistant Professor at Jagadamba College Achalpur |
| **2017-18** | Mr. C. H. Wasu | Assistant Clerk in Mantralay, Bombay |
| **2018-19** | Dr. U. B. Ghodeswar | Awarded D. Lit UGC Delhi |

**4. Research**

**I. Papers Published in Journals:-**

| Title of Paper | Name of the author/s | Department of the teacher | Name of Journal | Year of publication | ISSN/ISBN Number |
|---|---|---|---|---|---|
| आर्थिक विकासाचे मोजमाप म्हणजेच मानव विकास P.P : 4-10 | Mr. M.K.Nannaware | Economics | AKANSHA | Sept 2015 | ISSN-2395-759X Vol-1 ISSUE-V |
| डॉ. बाबासाहेबआंबेडकर– एकअर्थशास्त्रज्ञ P.P. : 33-37 | Mr. M.K.Nannaware | Economics | ARTHSANWAD | April-June 2016/ | ISSN 0973-8452 खंड४०अंक१ |
| यूरोपियन महासंघातून इंग्लंड बाहेर जाण्याची कारणे व परिणामP.P. : 61-68 | Mr. M.K.Nannaware | Economics | ARTHMIMANSA | July- Dec 2016 | ISSN 2320-0197खंड१०अंक१ |
| महाराष्ट्रातील जल समस्या : कारणे व उपाय P.P. : 8-12 | Mr. M.K.Nannaware | Economics | AKANSHA | Dec. 2016 | ISSN-2395-759X Vol.-II ISSUE-XII |
| विदर्भाचा पर्यटन विकास P.P. : 81-85 | Mr. M.K.Nannaware | Economics | ARTHSANWAD | April-June 2017 | ISSN 0973-8452खंड४१अंक१ |
| बँकांची बुडीत कर्ज : एक चिंतनीय बाब P.P. : 120-122 | Mr. M.K.Nannaware | Economics | VIDYAWARTA | Oct. to Dec 2017 | ISSN-2319 9318ISSUE-20, Vol-16 |

# "आर्थिक विकासाचे मोजमाप म्हणजेच मानव विकास"

प्रा. एम. के. नन्नावरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, आकोट

## Abstract

**आर्थिक** विकासाच्या विवेचनामध्ये देशातील नैसर्गिक साधनसामग्रीची उपलब्धता, भांडवल, देशातील श्रम, श्रमाची कार्यक्षमता, कौशल्य इत्यादी घटकांचा समावेश होतो. लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न केले गेले तर आर्थिक विकास जलद गतीने साध्य करता येतो असा विचार पुढे आला आणि यातून मानव् विकास, मानवी भांडवल या घटकांसही महत्व प्राप्त झाले. मानव साधनसंपत्तीचा विकास हा सुध्दा एक घटक असून आर्थिक विकासाच्या अनेक घटकापैकी तो एक आहे. चांगल्या गुणवत्तेच्या मणुष्यबळामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढल्यास मदत होते. किंबहुना तो आणायचा असेल तर मानव विकासाला चालना देणे आवश्यक आहे. मानव विकास म्हणजे मानवाची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे होय. उत्तम निरोगी आरोग्य साक्षर कुशल आणि जागरूक असलेला श्रमपुरवठा उत्पादीत भांडवल मालमत्तेसाठी आवश्यक आहे. तेव्हा उत्तम शिक्षण, आरोग्य सेवा आणि योग्य आहारामध्ये गुंतवणुक करणे समर्थनीय आहे.

प्रस्तावना :

२१ व्या शतकाच्या सुरूवातीलाच विकास मोजण्याचा सुधारीत मापदंड उदयास आलेला दिसुन येतो. हा आधुनिक मापदंड म्हणजे मानव विकास होय. मानव विकास संकल्पना ही नवीन नसून तर ती विल्यम पेटट्रीपासून तर ॲडमस्मिथ पर्यंत, बॅगहॉट लिण्ट, वालरस अशा अनेक शास्त्रज्ञांनी मानव विकास या संकल्पनेचा उल्लेख केलेला दिसून येतो. मानवी घटक त्याच्या क्षमता व

Scanned with CamScanner





कौशल्याचा विचार ॲडमस्मिथने केला तर डॉ. मार्शलने "माणसामध्ये केलेली गुंतवणूक हे सर्वात मौल्यवान असे भांडवल आहे असे म्हटले आहे."

**मानव विकासाचा अर्थ** : मानव विकास म्हणजे लोकांना मिळणाऱ्या संधीचा परिघ मोठा करण्याची प्रक्रिया होय. मानव विकासामध्ये सरासरी आयुर्मान, शिक्षण, रोजगार संधी, प्रतिव्यक्ती उत्पन्न, स्वत्वाची जपणूक आणि मानवी हक्काचे रक्षण इत्यादी घटकांचा समावेश होतो. मानव विकास त्या देशातील लोकांचे शिक्षण, आहार, आरोग्य आणि राष्ट्रीयत्वाचीभावना इत्यादी घटकांवर अवलंबून असतो.

**सॅम्युअलसनच्या मते** : मानव विकास म्हणजे मणुष्याची शारीरिक व बौध्दिक कार्यक्षमता वाढविण्यात आलेली यशस्वीता होय.

**कल्याणकारी अर्थशास्त्रज्ञांच्या मते** : मानवी कल्याणात वाढ घडवून आणणारी प्रक्रिया म्हणजे मानव विकास होय.

संयुक्त राष्ट्रसंघ अहवाल १९९७ (U.N.D.P) : मानवी विकास म्हणजे जनतेच्या कल्याणाचा उच्चस्तर साध्य करून त्यांच्या निवडीच्या प्रक्रीया विस्तारीत करणे होय.

मानव विकास निर्देशांक : १९९० मध्ये संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाअंतर्गत सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ महबूब–उल–हक यांच्या मार्गदर्शनाखाली मानव विकास निर्देशांक तयार करण्यात आला. या निर्देशांकाव्दारे देषाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीचे मापन करण्यात येते. निर्देशांक तयार करून आर्थिक विकासाची व्याप्ती लक्षात घेतली जाते किंवा मानव विकासाच्या साहायाने आर्थिक विकासाचा वेग लक्षात घेतला जातो. मानव विकास निर्देशांक हा शिक्षण, आरोग्य आणि आहार या सर्वच दृष्टीकोनातून तयार केला जातो. आयुर्मान आणि साक्षरता या नुसार विभागलेली लोकसंख्या उत्पन्नानुसार विभागलेल्या लोकसंख्येपेक्षा जास्त उपयुक्त

असा निर्देशांक ठरतो. हा निर्देशांक वरील बाजूने वाढणारा किंवा वाढ होत जाणारा असेल तर विकास साधणारा किंवा होणारा आहे असे म्हटले जाते. मानव विकासाचे मापन ज्या निर्देशांकाच्या साहाय्याने केले जाते, किंवा लोकांची वैयक्तिक प्रगती किती झाली आहे याचे मापन ज्या मापदंडाच्या साहाय्याने केले जाते त्या निर्देशांकाला मानव विकास निर्देशांक असे म्हणतात.

**मानव विकास निर्देशांकाचे सुत्र** : मानव विकास निर्देशांक तयार करण्यासाठी कमाल मूल्ये (उत्कृष्ट कामगिरी) .तर किमान मूल्ये (निकृष्ट कामगिरी) विचारात घेतली जातात. मानव विकास निर्देशांक निश्चित करतांना सुरूवातीस परिणाम निर्देशांक काढला जातो.

**परिणाम निर्देशांक** : प्रत्यक्ष मूल्य–किमान मूल्य,
कमाल मूल्य–किमान मूल्य

या सुत्राचा वापर करून आयुर्मान, साक्षरता आणि दरडोई उत्पन्न यांचा प्रत्येक परिणाम निर्देशांक काढला जातो आणि या तीन निर्देशांकाचा परिणाम निर्देशांकाची साधी सरासरी काढली जाते. तो म्हणजे मानव विकास निर्देशांक होय.

मानव विकास निर्देशांक सरासरी आयुर्मान निर्देशांक

- सरासरी ज्ञान संपादन निर्देशांक
- सरासरी जिवनमान निर्देशांक

मानव विकास निर्देशांकामध्ये सामाजिक व आर्थिक कल्याणाचा विचार करण्यात येत असल्याने हा निर्देशांक अधिक वास्तव व उपयुक्त आहे मानव विकास निर्देशांकात वाढ होणे ही सुधारणा मानली जाते.

**मानव विकासाची रचना किंवा घटक :**

- शिक्षण :

सामाजिक प्रगतीच्या दृष्टिने सक्षमीकरणाची प्रकिया म्हणजे शिक्षण होय. शिक्षण हा मुलभूत हक्क असून शिक्षणामुळे व्यक्तीच्या

Scanned with





जाणीवा रूंदावतात. व्यक्तीला जर आपल्या समोर असणाऱ्या पर्यायामधून कशाची निवड करावी याचे ज्ञान प्राप्त करावयाचे असेल किंवा निवड योग्य करायची असेल तर शिक्षणाला पर्याय नाही. शिक्षणातून संधीचा विस्तार व कौशल्याची वाढ या दोन गोष्टी मानव विकासासाठी साध्य होतात. उच्च प्रतीच्या मानव भांडवल व मानवी विकासासाठी शिक्षण महत्वाचा घटक आहे. शिक्षण आणि उत्पादकता तसेच विकास या बद्दल टी. डब्लू. शुल्टझ, डेनिसन, क्रुगर इत्यादी अर्थतज्ञानी महत्वपूर्ण विवेचन केल्याचे दिसून येते.

- आरोग्य :

देशातील लोकांची उत्पादन क्षमता वाढवायची असेल, कार्यक्षमता टिकवायची असेल तर शिक्षणाबरोबरच आरोग्य हा घटक महत्वाचा आहे. व्यक्तीचे आरोग्य केवळ उत्पन्नावर अवलंबूल नसते तर त्याची जगण्याची पध्दती, आहारातील पोषण मूल्ये, आयुमर्यादा, बालमृत्यु दर, पोषण दर्जा हे निकष महत्वाचे आहेत. त्याचप्रमाणे वैद्यकिय सुविधा, पिण्याचे सुरक्षित पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, झोपडपट्टीवासीयांचे प्रमाण, आजारपणाचा दर, किमान पोषण पातळी हे घटक आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे आहेत.

- उत्पन्न: !

आर्थिक विकासाच्या पातळीचे ठळक वैशिष्टय म्हणजे व्दितीय व तृतीय क्षेत्र ही अर्थव्यवस्थेला मजबूत करतात व रोजगार संधीही निर्माण होतात. दारिद्रय निर्मुलनासाठी रोजगार महत्वाचा आहे व तो नियमित आणि किमान उत्पन्नाची शाश्वती देणारा असेल. तर उत्पन्न वाढेल परिणामत: विकास शक्य होईल.

- सकस आहार:

सकस व पुरेशा आहारामुळे बौध्दिक व शारीरिक विकास होतो. संतुलीत व पुरेशा सकस आहारावर लोकांची कार्यक्षमता व उत्पादकता अवलंबुन असते. अविकसित देशातील नागरिकांना

सकस व पुरेसा आहार मिळत नसल्यामुळे कुपोषणाची समस्या निर्माण होऊन मानव विकासास मर्यादा येते.

जागतिक पातळीवरिल निर्देशांक :

UNDP अहवालातील मानव विकास निर्देशांकावरून देशाचे चार गट पाडले जाते त्यामध्ये अति उच्च मानव विकास , उच्च मानव विकास, मध्यम मानव विकास आणि निम्न मानव विकास अशा चार भागात करण्यात आली आहे. भारत हा सर्वात मोठा लोकशाही देश आहे. ब्रिक्स समुहात भारताने वर्णी लावली आहे. जागतिक क्षेत्रफळाच्या १/३ जमिनीवर ब्रिक्स समूहाच्या देशांचे वास्तव्य आहे. जागतिक लोकसंख्येपैकी ४२ % लोकसंख्या या समुहात राहते. जागतिक GDP मध्ये ब्रिक्स समुहाचा GDP हिस्सा २५ % आहे.

ब्रिक्स समुहातील HDI :

| देश | HDI -२०१४ | रँक | वर्गवारी | HDI -२०१३ | रँकमधील बदल | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|---|
| रशिया | ०.७७८ | ५७ | उच्च | ०.७७७ | ० | – |
| ब्राझील | ०.७४४ | ७९ | उच्च | ०.७४२ | १ | १ |
| चीन | ०.७१९ | ९१ | उच्च | ०.७१५ | २ | १ |
| दक्षिण आफ्रिका | ०.६५८ | ११८ | मध्यम | ०.६५४ | १ | १ |
| भारत | ०.५८६ | १३५ | मध्यम | ०.५८३ | ० | – |

वरील तक्त्यात २०१३ च्या तुलनेत भारताचा अपवाद वगळता समूहातील सर्वच देशांच्या मानव विकास निदेशांकात सुधारणा झाल्याचे दिसून येते. भारताचा क्रमांक १३५ असून तो मध्यम वर्गवारी या गटात मोडतो. जगाचा सरासरी मानव विकास निर्देशांक ०.७०२ आहे. त्यापेक्षा भारताचा निर्देशांक ०.५८६ लक्षणीय प्रमाणात खालावलेला असून तो दक्षिण आशियाई प्रदेशाच्या सरासरी ०.५८८ निर्देशांकापेक्षाही खालावलेला आहे.

**भारतातील मानव विकास निर्देशांक :**

जागतिक मानव विकास अहवालाच्या धर्तीवर भारत

Scanned with CamScanner





सरकारच्या नियोजन विभागाने UNDP च्या सहकार्याने भारत सरकारचा पहिला व एकमेव 'मानव विकास अहवाल–२००१' हा २००२ वर्षी प्रसिध्द झाला. या मालिकेतील दुसरा अहवाल भारत मानव विकास अहवाल–२०११ हा वर्ष २०११ मध्ये प्रसिध्द झाला. आर्थिक वृध्दीसाठी व दारीद्रयाचे प्रमाण कमी करण्यासाठी मानवी भांडवलाचा व मानवी कार्याचा आर्थिक कार्यात वाढता हस्तक्षेप हे महत्वाचे घटक असल्याचे भारत मानव विकास अहवालात समर्थन केले आहे. मानव विकास मापनासाठी राष्ट्रीय मानव विकास अहवाल, २०११ मध्ये आरोग्य निर्देशांक, शैक्षणीक निर्देशांक व उत्पन्न निर्देशांक हे तीन निर्देशांक तयार करण्यात आले आहेत. देशातील प्रमुख राज्यांमध्ये मानव विकास निर्देशांकात केरळ प्रथम क्रमांकावर असून त्या खालोखाल पंजाब व महाराष्ट्राचा क्रमांक आहे तसेच सन १९९९–२००० च्या तुलनेत सन २००७–०८ मध्ये मानव विकास निर्देशांकात सुधारणा झाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्य मानव विकास अहवाल : महाराष्ट्र राज्याने आपला पहिला मानव विकास अहवाल खालील निर्देशांक वापरून २००२ मध्ये प्रकाशित केला.

- अर्भक मृत्यूदर
- साक्षरता दर व विद्यार्थ्यांची शाळेत जाण्याची सरासरी वर्षे
- दरडोई जिल्हा उत्पन्नानुसार आर्थिक साध्यता

सन २०११ या कालावधीत महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक ०.६६६ पासून ०.७५२ पर्यन्त वाढला आहे तर ०.४३ पेक्षा कमी असलेल्या १२ जिल्हयांना 'अतिमागास' ही वर्गवारी लागू करताना शासनाने मानव विकास मिशन तर्फे स्थानिक गरजानूसार कार्यक्रम राबवला सूरूवात केली. राज्याचा दुसरा मानव विकास तयार करण्याचे काम यशदा, पुणे या संस्थेकडे सोपवीले आहे.

१९९० मध्ये UNDP अंतर्गत पहिला मानव विकास अहवाल प्रसिध्द करण्यात आला. मानव विकास या मापदंडाचे प्रवर्तक प्रा.

अमर्त्य सेन व प्रा. मेहबुब–उल–हक व आहेत. प्रा. मेहबुब–उल–हक या अर्थशास्त्रज्ञाने मानवी विकासासाठी चार आवश्यक घटक स्पष्ट केले आहेत. समन्याय किवा समानता, मानवी विकास साधण्यासाठी आधारशक्ती निर्माण करणे, लोकांमध्ये उत्पादकाता निर्माण करणे व लोकांना जास्तीत जास्त अधिकार प्राप्त झाले पाहीजेत व एकंदरीतच आरोग्य, शिक्षण, रोजगारसंधी व आहार यामधुन मानव विकास साधला जातो. या सर्वामुळे मानव विकास होऊन आर्थिक विकास वेगाने होईल.

**संदर्भ ग्रंथ सुची:–**

१. आर्थिक जगत, प्रथम आवृत्ती – २०१५.
२. अर्थसंवाद खंड, ३८ – २०१४.
३. मानव विकास अहवाल (UNDP) – २०१४.
४. बुलेटिन ऑफ युनिक अॅकॅडमी, पुणे – २०१४.
५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी – २०१३.
६. मानव विकास अहवाल, महाराष्ट्र – २०१२.
७. मानव विकास अहवाल, महाराष्ट्र – २००२.

CS Scanned with CamScanner



## "डॉ. आंबेडकर आणि दलित सहित्य"

प्रा. डॉ. गोपाल ज. ढोले.
डॉ. गो. खे. महाविद्यालय गाडेगाव
तेल्हारा जि. अकोला

१९२० चा काळ महाराष्ट्राच्या दृष्टीने अंत्यत महत्वाचा आहे. महाराष्ट्रातील बहुजन, ग्रामीण, विशेषत: दलित पददलित जनतेच्या दृष्टीने हा कालखंड अनन्यसाधारण महत्वाचा ठरतो. हजारो वर्षाच्या काळापासून धार्मिक गुलामगिरीच्या जोखडात अडकलेल्या दलित अस्पृश्यांना, वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, अस्पृश्यता इत्यादीमुळे माणुसकीच्या हक्कापासून वंचित राहावे लागत होते. पशूपेक्षाही हीन दर्जा बहिष्कृत समाजाला भारतीय विषम समाजव्यवस्थेने बहाल केला होता. परंतु याच अस्पृश्य जातीत जन्मलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा या काळात नेतृत्व म्हणून उदय झाला.

डॉ. आंबेडकरांनी या सर्व बाबींचा सखोल व चिकित्सक अभ्यास केला. हिंदू धर्म, धर्म ग्रंथ व हिंदू सवर्ण समाज यांचे दलित अस्पृश्य शूद्र जातीतील लोकांशी वर्तन, व्यवहार व त्यांची भूमिका या गोष्टींचा प्रचंड संताप आल्याने डॉ. आंबेडकरांनी हिंदू समाज, हिंदू धर्म व त्या धर्माचा मूलाधार असलेले वेद–पुराणादी स्मृती श्रुती ग्रंथ यांची जाहीर चिकित्सा सुरू केली. अस्पृश्यता हा नरदेहावरील कलंक असल्याने प्रसंगी स्वत:च्या रक्ताने तो कलंक धुऊन काढण्याची तयारी त्यांनी ठेवली. आणि या पाशनी गुलामगिरीतून पद दलित अस्पृश्यांना मुक्त करण्याचा कृतिशील कार्यक्रम त्यांनी सुरू केला. दलितांच्या अस्पृश्यांच्या जागृतीची मोहिम सुरू केली. समाजप्रबोधन व उद्‌बोधनासाठी डॉ. आंबेडकरांनी प्रथम 'वृत्तपत्र' या माध्यमाचा उपयोग केला. त्यांनी आपल्या आयुष्यात प्रथम 'मुकनायक'(१९२०) हे पत्रक सुरू केले. नंतर 'बहिष्कृत भारत'(१९२७), 'जनता'(१९३०), 'समता' व 'प्रबुध्द भारत' (१९५०)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर चैत्र-ज्येष्ठ १९३८

एप्रिल-जून २०१६ / खंड ४० अंक १



## अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर - एक अर्थशास्त्रज्ञ

मोरेश्वर के. नन्नावरे, आकोट,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय.
ई-मेल: mknannaware9@gmail.com
भ्रमणध्वनी: ९९२३९४८३८९

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न, कायदेपंडीत, पददलितांचे उद्धारक वा कैवारी, क्रांतीकारी व क्रियाशील विचारवंत, राजनीतिज्ञ, महान समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक यासारख्या अनेक बिरुदावलीनी सन्मानित झालेले एक श्रेष्ट दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ होते. स्वयंप्रेरणेने आणि स्वकर्तृत्वावर त्यांनी स्वतःची, समाजाची प्रगती साधली. त्याचबरोबर त्यांनी समाजातील आर्थिक, सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाला विकासाचा मार्ग दाखविला. भारत सरकारने त्यांच्या अलौकिक कार्याबद्दल *भारतरत्न* या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित केले. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक व राजकीय विचारांबरोबरच आर्थिक विचारातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. बाबासाहेबांनी आपल्या शैक्षणिक कारकिर्दीतही अर्थशास्त्रीय लिखाण केले.

अर्थशास्त्रज्ञ-डॉ. बाबासाहेब आंबेडकर:

अर्थशास्त्र हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जिव्हाळ्याचा, चिंतनाचा व संशोधनाचा विषय आहे. ते अर्थशास्त्राचे अभ्यासक होते. त्यांना त्या काळातील प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आर.ए. सेलिगमन, एडवीन कॅनन, भारतातील ब्रिटिश व्हॉईसराय इत्यादी तज्ज्ञांनी त्यांना अर्थतज्ज्ञ मानले. डॉ. आंबेडकर यांनी

अर्थशास्त्र या विषयात एम.ए., पी.एच.डी., एम.एससी., डी.एससी इ. या व अशा तत्कालीन उच्च प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या पदवी विश्वासातील वेगवेगळया विद्यापीठातून मिळविलेल्या आहेत.

**अर्थशास्त्रातील ग्रंथ/प्रबंध लेखक:**

अर्थशास्त्रातील डॉ. आंबेडकरांचे चिंतन ज्या ग्रंथ/प्रबंध लेखनातून सिद्ध झाले आहे, त्यानुसार त्यांचे निखळ अर्थविषयक ग्रंथ, आनुषंगीक अर्थविषयक ग्रंथ, अर्थ समस्येवरील भाष्य लेख- याप्रमाणे वर्गीकरण करता येईल. या वर्गीकरणानुसार डॉ. आंबेडकरांच्या एकूणच अर्थविषयक ग्रंथाची/लेखांची खालीलप्रमाणे मांडणी करता येते.

अ)निखळ अर्थविषयक ग्रंथ :

1. Administration and Finance of the East India Company - 1925.
2. The Evolution of Provincial Finance in British India - 1925.
3. The Problem of Rupee : Its Origin and Solution - 1923. (History of Indian Currency and Banking No. 1 - 1947)

आ)आनुषंगिक अर्थविषयक ग्रंथ :

1) Annihilation of Caste - 1936.
2) What Congress and Gandhi have done to the Untouchables - 1945
3) Buddhism and Communism / Budda or Karl Marx.
4) States and Minorities (1946) - 1947

इ)अर्थसमस्येवरील लेख

1) Small Holdings in India and Their Remedies - 1918
2) Mr. Russell and the Reconstruction of Society - 1918.

ह्या सर्व लेखनातून डॉ. आंबेडकरांचे सैद्धांतिक व आर्थिक प्रश्नांसंबंधीचे अर्थचिंतन पुढे आले आहे. हे अर्थचिंतन डॉ. आंबेडकरांचा एक निष्णात अर्थतज्ज्ञ म्हणून अर्थशास्त्रातील अधिकार अधोरेखित करणारे असून त्यांचे या क्षेत्रातील दूरदर्शित्वही सिद्ध करणारे आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार समजून घेण्यासाठी त्यांच्या अर्थशास्त्रातील अभ्यासविषयाचे खालीलप्रमाणे विभाग पाडून त्यांच्या विचारांचा आढावा घेता येतो.

**मिश्र अर्थव्यवस्था:**

उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण व्हावेत असे डॉ. आंबेडकरांचे विचार होते, संपूर्ण उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण न करता सामाजिक राष्ट्रहिताच्या दृष्टीने आवश्यक अशा मूलभूत व पायाभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण व्हावे व इतर सर्व उद्योगधंदे खाजगी क्षेत्राकडे सोपविले पाहिजे असे त्यांचे मत होते, त्यांनी विमा, बँक व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करावे असे सूचविले. कारण आर्थिक नियोजनासाठी वित्तपुरवठ्याची आवश्यकता पूर्ण व्हावी याकरिता काही वित्तीय साधने उपलब्ध झाले पाहिजेत, म्हणून त्यांनी या व्यवसायाच्या राष्ट्रीयीकरणाचे प्रतिपादन केले.

**लोकसंख्या नियंत्रण:**

स्वतंत्र मजूर पक्ष या पक्षाची घटना, ध्येय व कार्यक्रम याबद्दलचा वृत्तांत टाईम्स ऑफ इंडियाच्या १५ ऑगस्ट १९३६ च्या अंकात बाबासाहेबांनी प्रसिद्ध केला. त्यामध्ये त्यांनी Pressure of Population (लोकसंख्येचा ताण)

Scanned with C

यावर लिखाण केले. बाबासाहेबांनी देशातील बेकारीचे मूळ कारण लोकसंख्या वृद्धी हेच जाणून बेकारीवरील प्रतिबंधक उपाय म्हणून संतती नियमनाचा पुरस्कार करण्याचे आव्हान केले होते. लोकसंख्या नियंत्रणाचा प्रस्ताव विधानसभेत आपले नेक सरदार पी. जेरोहम यांच्या करवी १० नोव्हेंबर १९३८ रोजी मांडला. प्रस्ताव मांडून आज जवळ जवळ ७७ वर्षे उलटून गेली आहेत. लोकसंख्या नियंत्रणाबाबत जाणीवपूर्वक विचार आज केला जात नाही. जन्मप्रमाण झपाट्याने वाढत आहे. मृत्युप्रमाण तितक्याच वेगाने घटत आहे. त्यामुळे बेकारीचे प्रमाण अवाढव्य वाढत आहे. निकृष्ट आहार, राहण्याच्या जागेचा यक्षप्रश्न, लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा कमी उत्पादन इत्यादी ज्वलंत प्रश्न आज आपल्या समोर उभे आहेत.

दारिद्र्य निर्मुलनः

डॉ. आंबेडकरांना देशातील दारिद्र्याबद्दल अत्यंत चिंता होती. त्यांच्या मते अनैतिकतेचे मूळ कारण दारिद्र्य आहे. १९३६ साली मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात म्हणतात की, शेतजमिनीचे झालेले तुकडे नि तिच्यावर वाढत्या लोकसंख्येचा ताण ही खरी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे आहेत. डॉ. आंबेडकरांच्या मते विमा योजना ही सरकारच्या मालकीची होईल आणि ती ग्रामस्थांना निष्पक्ष पणाने भाडेपट्टीने दिली जाईल. त्यामुळे कोणी कूळ किंवा भूमिहीन राहणार नाही. ग्रामीण औद्योगिकीकरणाच्या उद्देशाने तयार केलेल्या नियोजनातही ग्रामीण भागातील अस्पृश्य मजुरांची, बेकारांची संख्या वाढत आहे आणि परिणामतः त्यांना दारिद्र्याच्या भयानक परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे.

शेती:

डॉ. आंबेडकरांचे शेतीविषयक विचार व त्यांचा दृष्टिकोन आर्थिक समाजवादाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहेत. शेतजमिनीची खासगी मालकी रद्द करून त्या ऐवजी सामूहिक मालकी प्रस्थापित करावी असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांनी कृषीच्या व्यवस्थेसंबंधीचे विचार आपल्या Small Holdings in India 1918 State and Minorities व इतर लेखनात मांडले आहेत. सामुहिक शेतीचे व्यवस्थापन करण्यासाठी आंबेडकरांनी पुढील मार्ग सांगीतले आहेतः

१) सरकारने शेतीचे समान प्रमाणात विभाजन करून ग्रामीण लोकांना शेती कूळ म्हणून कसण्यास द्यावी.
२) सरकारने उत्पादन वाढवण्यासाठी बी-बियाणे, खते, अवजारे इत्यादीसाठी अर्थपुरवठा करावा.
३) जमीन कुळाने दिली जात असताना सरकारने जात, धर्म इत्यादीचा विचार करू नये, तसेच श्रीमंत-गरीब असा भेद करू नये.
४) सरकारने घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन झाल्यास दंडाची शिक्षा करावी.

औद्योगिकरणः

शेती क्षेत्रातील बेकारी औद्योगिकरणामुळे कमी होते असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्याचबरोबर औद्योगिकरणामुळे ग्रामीण भागातील जनतेचे स्थलांतर शहरी भागात होऊन त्यांना रोजगाराच्या संधी निर्माण होईल आणि त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थितीमध्ये बदल होईल असे डॉ. आंबेडकरांना आर्थिक लोकशाही निर्माण करण्यासाठी आणि मागासलेल्या जनतेची आर्थिक विवंचना कमी करण्यासाठी औद्योगिककरणाला प्राधान्य दिले त्यांनी औद्योगिकरणाचा आकृतीबंध कसा असावा, त्याबद्दल त्यांनी आपले मत मांडले.

१) देशातील मूलभूत व महत्त्वाचे उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे असावेत व ते उद्योगधंदे त्यांच्या नियंत्रणाखाली चालविणे.

२) इतर उद्योगधंदे खासगी क्षेत्राकडे सोपवीत १९५६ च्या औद्योगिक धोरणात त्यासाठी काही बदलही करण्यात आले. सरकारने महत्त्वाचे व मूलभूत उद्योगधंदे स्वतःच्या ताब्यात घेतले व कमी महत्त्वाचे उद्योगधंदे खाजगी क्षेत्राकडे सोपविण्यात आले.

मालमत्तेची मालकी:

डॉ. आंबेडकरांनी स्वतःची मालमत्ता जवळ बाळगण्याच्या हक्कात विरोध केल्याचे आढळून येते. त्यांच्या मते मालमत्तेच्या अधिकारामुळे व्यक्ती स्वतंत्र व निःपक्षपातीपणे विचार करू शकत नाही. उलट समाजात शोषणाचे प्रमाण वाढत जाते. त्यामुळे त्यांनी खाजगी मालमत्ता हक्काला विरोध केला.

सार्वजनिक आय-व्यय:

डॉ. आंबेडकरांचे सार्वजनिक आय-व्यय संबंधीचे विचार त्यांनी एम.एस.सी. (इकॉनॉमिक्स) साठी लिहिलेल्या 'The evalution of provincial finance in British India' या प्रबंधात तसेच भारतीय घटनेच्या २७७ व्या कलमावर घटनासमितीची झालेली चर्चा, मजूर पक्षाचे करविषयक धोरण, अंदाजपत्रकावरील भाषणे यावरून त्यांच्या सार्वजनिक आयव्ययांचा विचारांचा अभ्यास करता येतो. डॉ. आंबेडकरांनी मजूर पक्षाच्या जाहिरनाम्यात १९३६ मध्ये मांडलेल्या त्यांच्या मते करपात्रतेनुसार कर आकारण्यात यावेत, तसेच उत्पन्नाच्या विशिष्ट मर्यादेपर्यंत कर आकारण्यात येऊ नयेत. त्याचबरोबर कर आकारतांना कराचा व्यक्तीच्या राहणीमानावर परिणाम होणार नाही याची काळजी घ्यावी. कर मालमत्तेवर आकारावा असे सुचविले. कर हे प्रगतिशील असावेत, श्रीमंताकडून जास्त कर वसूल करावा व गरीबांना करामध्ये सवलत द्यावी त्याचबरोबर जमीन महसुलावरील कर लवचीक व बदलणारे असावेत.

द्रव्यविषयक विचार (मुद्रानीति):

डॉ. आंबेडकरांचे चलन विषयक विचार त्यांनी डी.एससी. पदवी करतांना लिहिलेला The Problems of the Rupee; its origin and solution - 1923 हा प्रबंध आणि त्यांनी हिल्टन यंग कमिशनपुढे देलेली साक्ष-१९२५ यात उपलब्ध होतात. या ग्रंथात आंबेडकरांनी भारतीय रुपयाचा अनेक अंगानी उहापोह केला. इंग्लंड व भारतातील पगारदारांचे उत्पन्न व वस्तुंचे भाव यांचा आलेख देऊन त्यांनी त्यावेळी दाखवून दिले की, इंग्लंडमध्ये पगार जास्त तर भाव कमी, तर भारतात पगार कमी व वस्तूचे भाव जास्त, त्यामुळे रुपयाची क्रयशक्ती घटत चाललेली निदर्शनास आणली. डॉ. आंबेडकरांनी सुवर्ण पद्धती ऐवजी सुवर्ण चलन विनिमय दर पद्धतीचा वापर व्हावा असे मत होते, कारण जो पर्यंत रुपया स्थिर राहू शकत नाही म्हणून त्यांनी अपरिवर्तनीय कागदी चलन पद्धतीचा पुरस्कार मर्यादित चलन निर्मितीसह सुचवले. चलनाचे बहिर्गत मूल्य कसे ठरते याबाबत डॉ. आंबेडकर म्हणतात, चलनाचा विनिमय दर चलनाच्या खरेदीशक्ती समता सिद्धांतानुसार ठरतो. चलनाची खरेदी शक्ती कमी जास्त झाल्यास चलनदर बदलतो, त्यानुसार विनिमय दर ठरतो. त्यांनी भारतीय चलनात सुधारणा सूचविल्या -

१) रुपया नाणे पद्धती बंद करावी.

२) सोन्याचे नाणे आणि रुपया यातील प्रमाण

ठरवावे.

३) रुपयाचे रुपांतर सोन्यात अगर सोन्याचे रुपयात रुपांतर करू नये.

४) सोन्याची टाकसाळ उघडावी.

दारूबंदी:

डॉ. आंबेडकर हे दारूबंदीच्या विरोधी होते कारण दैनंदिन जीवणात दारू टाळणे आवश्यक आहे तसेच बंदी घातल्यामुळे बेकायदेशीर दारूला चालना मिळेल त्यामुळे सरकारचे उत्पन्न बुडेल, त्यामुळे त्यांच्या मते दारूच्या उत्पन्नावर व वितरणावर सरकारने बंद घालावी त्यासाठी त्यांनी परवाना पद्धत आणि शिधा वाटप पद्धत दारू पिण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सुचविली. त्यांनी असे सुचविले की, दारू व्यापारामुळे जे उत्पन्न मिळेल त्याचा वापर सरकारने शेतकऱ्यांसाठी व शिक्षणासाठी करावा.

आर्थिक लोकशाही:

डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाही म्हणजे सरकारचे असे रूप आणि पद्धत की जेथे रक्ताचा एक थेंबही न सांडता जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणले जातात त्यांच्या मते आर्थिक आणि सामाजिक लोकशाही या लोकशाहीच्या रक्त वाहिन्या आहेत. त्यामुळे आर्थिक व सामाजिक लोकशाही शिवाय राजकीय लोकशाही यशस्वी ठरू शकत नाही.

कामगार चळवळीचे नेतृत्व:

भारतीय कामगार, शेतकरी व शेतमजुराबद्दल डॉ. आंबेडकरांना अतीव आस्था होती. समता व स्वातंत्र्य मूल्यांच्या आधारे डॉ. आंबेडकरांनी शेतमजुरांना १९४८ च्या किमान वेतन कायद्यातील तरतुदीचा फायदा मिळवून दिला. १५ सप्टेंबर १९३८ मध्ये मुंबई विधिमंडळात संप करणे बेकायदेशीर ठरणारे औद्योगिक कलहाचे विधेयक आले तेव्हा त्यांना डॉ. आंबेडकरांनी कडाडून विरोध केला. त्यावर मत मांडतांना ते म्हणतात की, संप करणे हा दिवाणी अपराध आहे फौजदारी गुन्हा नव्हे. मनुष्याच्या इच्छेविरुद्ध त्याला काम करावयास भाग पाडणे म्हणजे त्याला गुलाम बनविणे होय. कामगार संपाच्या हक्काचे डॉ. आंबेडकर समर्थक होते. परंतु हा संप राजकीय हेतुने प्रेरित नसावा, तो कामगारांच्या हितासाठी असावा असे त्यांचे मत होते.

समारोप:

डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रीय विचार अत्यंत अभ्यासपूर्ण व सैद्धांतिकदृष्ट्या मांडले आहेत. त्यांचे लोकसंख्या नियंत्रणावरील विचार, कृषीविषयक दृष्टिकोन उद्योगांचे राष्ट्रीयीकरण यावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. तसेच चलन विषयक विचारामधून उत्कट देशभक्ती दिसून येते. त्याचप्रमाणे सार्वजनिक आयव्यय, करविषयक पुरोगामी विचारसरणी व कामगार चळवळीतील त्यांच्या योगदानावरून ते तोलामोलाचे अर्थशास्त्रज्ञ होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

संदर्भसूची:


१) पोळ अनुवाद अरविंद, *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकसंख्या नियंत्रणावरील विचार,* (परिचेकर) १९८६, पृ. ४

२) डॉ. जाधव नरेन्द्र, *डॉ. आंबेडकर ! आर्थिक विचार आणि तत्वज्ञान,* १९९२, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

३) प्रा. गायकवाड माधव मु., *समताधिष्ठित समाजनिर्मितीचे आंबेडकरी अर्थशास्त्र व भारतीय अर्थव्यवस्था,* योजना मासिक मुंबई मधील प्रकाशित लेख, जुन २००२, पृ. २

४) कांबळे आनंद, *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे*

ISSN 2320 - 0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३८
(जानेवारी-जून २०१७ / खंड १०, अंक १)


- Inter-disciplinarity in Social Science Research : Shifting Goals and Missing Paths
- अर्थसंकल्प २०१७-२०१८ : दशा आणि दिशा
- The Empirical Analysis of the Relationship between Agricultural and Industrial Sectors in India
- अनौपचारिक क्षेत्रातील व्यवसायांचे अध्ययन – संदर्भ अमरावती शहर
- जलयुक्त शिवार अभियान – सिंचन विकास व पाणी उपलब्धता

-युरोपियन महासंघातून ब्रिटनचे निर्गमन (Brexit)-

- ब्रेक्झिट : २१ व्या शतकातील अर्थकारणाचे राजकारण
- Brexit : Trade relations between India and United Kingdom
- ब्रेग्झिट : कारण परिणाम मीमांसा
- ब्रेग्झिट : कारणे व परिणाम
- युरोपियन महासंघातून इंग्लंड बाहेर जाण्याची कारणे व परिणाम
- ब्रिटनचे युरोपियन संघातून बहिर्गमन – एक धावता दृष्टीक्षेप
- ब्रेग्झिट : जागतिकीकरणाकडून राष्ट्रीयकरणाकडे

# युरोपियन महासंघातून इंग्लंड बाहेर जाण्याची कारणे व परिणाम

मोरेश्वर के. नन्नावरे
सहा. प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, आकोट

**प्रस्तावना :**

अमेरिकेतील १९२९ मधील मंदीमुळे साऱ्या जगाला हादरा बसला. त्यानंतर जगात आमूलाग्र बदल झाले आणि जीवनाचे अर्थही बदलले. अनेक नवीन कल्पना अंमलात आल्या आणि अनेक संज्ञा रूढ झाल्या. ब्रेक्झिट ही त्यानंतरची दुसऱ्या क्रमांकाची परिणामकारक घटना म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण ही घटना आर्थिकच नव्हे तर जगाच्या दृष्टीनेही अत्यंत दूरगामी बदल घडवणारी आहे. एकविसाव्या शतकातील सर्वाधिक महत्त्वाची अशी ही घटना. जागतिक अर्थकारण बदलण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. युरोपीय संघाची कार्यपध्दती, ब्रिटनचे सार्वभौमत्व, आशिया - आफ्रिका - आखाती देशांमधून युरोपमध्ये स्थलांतर, बेरोजगारी आणि आर्थिक संकट, इस्लामिक दहशतवादाची शक्यता इ. कारणांचा समावेश आहे. अल कायदा, तालिबान आणि आयसिस यांसारख्या दहशतवादी संघटना युरोपमध्ये विस्तारत आहेत. यामुळे ब्रिटनबरोबरच इतर युरोपीय देशांमध्ये असंतोष पसरला आहे. हा असंतोष ब्रिटिश राष्ट्रवादाच्या चौकटीत व्यक्त केला जात आहे, असे मानले जाते. यातून विभागीय पातळीवरील महासंघाचा विचार मागे पडत आहे. ब्रेक्झिटमुळे विसाव्या शतकातील आर्थिक एकीकरणाच्या सिध्दांताला धक्का बसल्याचे मानले जाते.

युरोपियन संघाच्या राजकीय चौकटीतून निर्माण झालेल्या व्यापारी निर्बंधामुळे ब्रिटनला भारत व चीनसारख्या देशांशी स्वतंत्र व्यापारी संबंध प्रस्थापित करता येत नाहीत, अशी भावना ब्रिटनमध्ये पसरल्याने ब्रिटन - युरोपीय संघ संबंधावर काही प्रमाणात परिणाम झाल्याचे दिसून येते. युरोपीय संघाचा सदस्य या नात्याने ब्रिटन जे शुल्क युरोपीय संघात जमा करते, त्या प्रमाणात ब्रिटनला लाभ होत नसल्याची भावनाही निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर ब्रेक्झिटचा ब्रिटन, युरोपीय संघ, जागतिक व भारतावर होणारा परिणाम याविषयी प्रस्तुत शोध निबंधामध्ये ऊहापोह करण्याचा प्रयत्न आहे. सर्वप्रथम ब्रिटनमध्ये घेण्यात आलेले जनमत, युरोपीय संघाची पार्श्वभूमी, ब्रिटनच्या विरूद्धार्थ व समर्थनार्थ मुद्दे व संघातून बाहेर पडल्यावर त्याचे अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम याचा अभ्यास करणे उचित ठरेल.

**ब्रिटनमधील जनमत चाचणी (Referendum):**

१९७५ साली झालेल्या जनमत चाचणीत ब्रिटनने युरोपियन इकॉनोमिक कम्युनिटीत राहण्याच्या बाजूनं कौल दिला होता. पण त्यानंतरच्या काळात युरापियन राष्ट्रसंघटनेचं रूप बरंच बदललं आहे. हे बदल आजच्या ब्रिटनला मान्य आहेत का, हे पडताळून पाहण्यासाठी ही जनमत चाचणी.

जगभरातून याबाबत उलट सूलट चर्चेला सुरूवात झाली. ब्रिटनने युरोपीयन महासंघातून बाहेर पडू नये अशी जर्मनी, फ्रान्स सारख्या अनेक युरोपीयन समुहातील सदस्य देशांची इच्छा होती. युरोपीयन संघातुन बाहेर पडण्यासाठी २३ जून २०१६ ला ब्रिटनमध्ये सार्वमत घेण्यात आले आणि त्यात ७२ टक्के मतदान झाले. त्यापैकी ५२ टक्के लोकांनी ब्रिटनने युरोपियन महासंघातून बाहेर पडावे असा कौल दिला तर ४८ टक्के जनतेने युरोपियन समुहातून ब्रिटनने बाहेर पडू नये अशी इच्छा व्यक्त करत मतदान केले. जर्मनमधील वृत्तपत्र 'देयर श्पीगेल' या वृत्तपत्रात 'ब्रिटनने बाहेर पडू नये' या आशयाच्या मथळयाने मोठी बातमी प्रसिद्ध केली गेली होती. ब्रिटीश पंतप्रधान डेव्हीड कॅमरून यांनी गेल्या निवडणूकीत आपण युरोपियन युनियनमध्ये कायम राहण्यासाठी प्रयत्न करू आणि कॅम्पेनिंग चालू ठेवू असे आश्वासन दिले होते. पण यात ते यशस्वी होऊ शकले नाहीत याची जबाबदारी घेत त्यांनी पद सोडण्याची घोषणा केली.

**ब्रेक्झिटचा अर्थ :**

ब्रिटनने युरोपीय संघातून (युरोपियन युनियनमधून) बाहेर पडण्याच्या प्रक्रियेला 'ब्रेग्झिट' असे नाव देण्यात आले आहे. ब्रिटनच्या स्पेलिंगमधील 'बी' आणि 'आर' ही अक्षरे आणि 'एग्झिट' (बाहेर पडणे) यांना जोडून 'ब्रेग्झिट' शब्द तयार केला आहे. अशाच प्रकारे पूर्वी युरोपीय संघातून ग्रीस हा देश बाहेर पडण्याची शक्यता होती तेव्हा 'ग्रेग्झिट' असा शब्द वापरण्यात आला होता. हा निकाल जगाच्या राजकारण आणि अर्थकारणावर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. याआधी १९८५ साली मच्छीमारीच्या अधिकारावरून डेनमार्क आणि ग्रीनलँड यांचा युरोपियन महासंघाशी वाद झाला होता आणि हे देश युरोपियन महासंघातून बाहेर पडले होते. २०१४ साली स्कॉटलंडने ब्रिटनमध्ये रहावे की नाही, यासाठी जनमत चाचणी झाली होती. यामुळे युरोपियन महसंघाला काही फरक पडला नव्हता. पण ब्रिटन बाहेर पडल्यामुळे मात्र युरोपियन महासंघाच्या आर्थिक व्यवस्थेला मोठा फरक पडणार आहे. आता युरोपमधील अन्य देशांतही एक्झिटची चर्चा सुरू झाली आहे. किमान फ्रान्स, ऑस्ट्रिया आणि नेदरलँड्स या देशांमधील जनतेला सार्वमत घेऊन महासंघातून बाहेर पडावे, असे वाटते. असे वृत्त युरोपमधील प्रसारमाध्यमां मध्ये दिसत आहे. 'ब्रेक्झिट' या सार्वमतासाठी प्रचलित झालेल्या शब्दाने ब्रिटनचे आर्थिक, राजकीय, सामाजिक वातावरण पुरते ढवळून काढले आहे.

**युरोपीय संघाची पार्श्वभूमी :**

दुसऱ्या महायुद्धातील भीषण संहारानंतर युरोपमध्ये पुन्हा युद्धाचा प्रसंग उदभवू नये आणि अधिकाधिक देशांमध्ये दृढ व्यापारी संबंध असतील तर तशी वेळ येण्याची शक्यता कमी असेल, या विचाराने युरोपीय संघाची स्थापना झाली होती. सुरूवातीला जर्मनी आणि फ्रान्सच्या पुढाकाराने १९५० मध्ये बेल्जियम, फ्रान्स, पश्चिम जर्मनी, इटली, लक्झेमबर्ग, नेदरलँड या सहा देशांनी कोळसा आणि पोलादाचा वाटा एकत्रित केला. त्यानंतर १९५७ वर्षांनी रोम (ट्रीट ऑफ रोम) करारानुसार 'युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी'ची (EEC) स्थापना झाली. ब्रिटन त्यामध्ये १९७३ साली सामील झाला. सदस्य देशांची संयुक्त बाजारपेठ स्थापन करणे, वस्तू सेवा आणि कामगारांची मुक्त वाहतूक करणे असे त्याचे उद्देश होते. आता त्यात विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण आणि मानवी हक्कांचे संरक्षण,

विभागीय असमतोल दूर करणे, शिक्षण व संशोधन या क्षेत्रातील सहकार्य याची भर पडली आहे. युरोपियन कमिशन, युरोपियन काऊन्सिल, युरोपियन पार्लमेंट आणि कोर्ट ऑफ जस्टिस या ४ उपसंस्थांच्या माध्यमातून युरोपियन युनियनचे काम चालते. त्याचे मुख्यालय ब्रेसल्स येथे आहे.

युरोपियन महासंघाने १९८६ मध्ये 'सिंगल युरोपियन ॲक्ट' हा कायदा अंमलात आला आणि पुढील सहा वर्षात या संघटनेच्या सदस्य राष्ट्रांत व्यापार खुला झाला आणि त्यांची 'एक बाजारपेठ' (कॉमन मार्केट) जन्माला आली. १९९३ मध्ये या संघटनेमध्ये उत्पादने, सेवा, जनता, पैसे या चार गोष्टींची खुली आवक - जावक सुरू करण्यात आली. १ नोव्हेंबर १९९३ रोजी 'मॅस्ट्रीच करार' (Mastricht Treaty) झाला. या करारानूसार तीन ऐतिहासिक बदलांवर सहमती झाली. पहिला 'युरोपियन कम्यूनिटी'चे नामांतर 'युरोपियन यूनियन कम्यूनिटी' असे करण्यात आले. दुसरा EU सदस्यांची संख्या वाढवण्याचे ठरले. तिसरा आणि महत्त्वपुर्ण बदल म्हणजे युरोपियन सेंट्रल बँक व युरो झोन (चलनव्यवस्था) निर्माण करण्यात आला, ज्यात १२ सदस्य देशांनी २००२ पर्यंत युरोला चलन म्हणून स्विकारण्याची सीमा निश्चित करण्यात आली. पण ब्रिटन सदस्य असुनही चलन स्विकारण्यास तयार नव्हता त्यामुळे ब्रिटन युरो झोनमधून बाहेर होता. हा प्रकार म्हणजे युरो चलनासाठी अडथळ्याची शर्यत होती. २८ पैकी १९ देशांनी याचा कॉमन करन्सी म्हणून स्विकार केला होता. ब्रिटन आपले स्टर्लिंग पौंड हे चलन सोडण्यास तयार नव्हते. २००४ साली युरोपियन महासंघाचे १० सदस्य बनले होते आणि २०१३ साली क्रोएशिया युरोपियन महासंघाचा २८ वा सदस्य झाला होता. २८ देश आणि ५० कोटी लोकसंख्येच्या ईयुची अर्थव्यवस्था १६ खर्व डॉलर्सची असून तिचा जागतिक दरडोई उत्पन्नातला वाटा १/४ इतका आहे. 'शेन्झेन करारा'नंतर ईयुमधील नागरीक सदस्य देशात व्हिसाशिवाय मुक्तपणे प्रवास, व्यापार, नोकरी करू शकतात आणि युरो हे एकच चलन वापरले जाते.

**युरोपीयन संघातून बाहेर पडण्याच्या बाजूने समर्थन :**

*** स्थलांतरितांचा प्रश्न :**

बेफाट स्थलांतर हेच ब्रिटनच्या बाहेर पडण्याच्या निर्णयामागील मुख्य कारण आहे. परदेशातून येऊन ब्रिटनमध्ये नोकरीधंद्यासाठी गेल्या वर्षी आलेल्या ३,३६,००० स्थलांतरितांपैकी निम्म्याहून जास्त (१,८८,०००) लोक युरोपीय महासंघातून आले होते. ब्रिटिश नागरिकांच्या रोजगाराच्या संधी हिरावल्या जातात. इतकेच नव्हे तर घरे, आरोग्य सेवा, शिक्षण संस्थेत देखील ते आपला वाटा मागतात. त्यात भर पडली आहे.

*** निर्वासितांचा प्रश्न :**

सध्या ब्रिटनमध्ये १.२ दशलक्ष नागरिक युरोपीय संघाच्या सदस्य देशांत राहतात. तर अन्य सदस्य देशांचे ३ दशलक्ष नागरिक ब्रिटनमध्ये राहतात. युरोपीय संघाच्या नियमांमुळे सदस्य देशांच्या नागरिकांना सामूहिक पारपत्रावर मुक्तपणे फिरता येत होते. आफ्रिका व मध्यपूर्वेतून युरोपात बरेच निर्वासित येत आहेत. प्रत्येक सभासद राष्ट्राने किती निर्वासितांना आसरा द्यायचा याचा कोटा महासंघामार्फत वाटला जातो. गत व चालू वर्षात महासंघ जवळपास १५ लाख निर्वासितांना आसरा देणार आहे. याच्या प्रतिक्रिया ब्रिटनसकट महासंघातील सर्वच राष्ट्रांमध्ये उमटत आहेत. 'आपल्या सीमा आपल्याच ताब्यात' ही घोषणा

अनेक देशांतील आंदोलकांमध्ये लोकप्रिय झाली आहे.

*** अर्थसंकल्पातील वाटा :**

महासंघाचा वार्षिक खर्च सभासद राष्ट्रेच उचलतात; २०१५ मध्ये ब्रिटनचा वाटा १३ बिलियन पौंडचा होता. महासंघाकडून त्यांना मदत देखील मिळते. २०१३ मध्ये ब्रिटनला ७ बिलियन पौंड मिळाले. महासंघात राहणे म्हणजे ब्रिटनसाठी आतबट्ट्याचा व्यवहार आहे. एकूण या व्यवहारात मोठा तोटा होत आहे. ब्रिटनला मिळणारा परतावा अन्य देशांच्या तुलनेत कमी होता.

*** महासंघाची नोकरशाही :**

महासंघाची नोकरशाही अलीकडे हाताबाहेर गेली आहे. फक्त गेल्या पाच वर्षांत महासंघाच्या नोकरशहांनी सभासद राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांना निर्देशित करणारे ३५०० छोटे - मोठे कायदे, नियम, परिपत्रके प्रसृत केली. कायदे - नियमांचा अतिरेक झाला की त्यांचे पालन करण्याचा खर्च (कम्प्लायन्स कॉस्ट) अवाच्या सवा वाढतो. सर्वच उत्पादकांचा हा खर्च वाढला आहे.

*** मांडलिकत्वाची भावना :**

युरोपियन महासंघात राहिल्यास स्थलांतरित, निर्वासितांचा प्रश्न, व्यापार, सुरक्षा धोरण, दहशतवाद विरोधी लढा यावर महासंघाचाचे नियंत्रण राहील. इंग्लंडकडे कोणताही अधिकार नसेल अशी सर्वसामान्य नागरिकांची भावना आहे.

*** बिनकामांचा खर्च :**

संघाचे सदस्य एकत्र खर्चासाठी काही निधी गोळा करतात आणि त्यांनाही संघातून विकासकामांसाठी काही निधी परत मिळतो. महासंघाच्या वार्षिक खर्चात २०१५ मध्ये ब्रिटनचा वाटा १२.५७ टक्के म्हणजे १३ अब्ज पौडांचा होता. युरोपीयन संघामुळे इंग्लंडच्या व्यापारावर अनेक बंधने आले आहेत. संघाला वर्षाला जेवढी रक्कम दिली जाते त्या तुलनेत फार कमी फायदा मिळतो. दर आठवडयाला ३५० दशलक्ष पौंड महासंघाला दिले जातात असा दावा केला जातो. त्यामुळे सुरक्षा व्यवस्था आणि एन.एच.एस. सारख्या आरोग्याच्या सेवा कोलमडल्याचा राग ब्रिट्रीश नागरिकांमध्ये आहे. त्यातूनच युरोपियन संघातून बाहेर पडण्याची मानसिकता बळावली आहे.

*** राजकीय पातळीवर दुफळी :**

युरोपियन महासंघाच्या प्रश्नावर इंग्लंडच्या राजकीय पक्षांमध्ये देखील दोन गट (सत्ताधारी हुजूर पक्ष व मजूर पक्ष) पडले आहे. १९७३ मध्ये ब्रिटन युरोपी महासंघाचा सदस्य झाल्यापासूनच 'ब्रेक्झिट' च्या बाजूने चळवळ सुरू झाली आहे. २०१२ मध्ये प्रचलित झालेला 'ब्रेक्झिट' हा शब्द आणि ही चळवळ काही नेत्यांपुरती एका 'कोपऱ्या'तील चळवळ होती, ती एकाएकी मोठी राजकीय चळवळ झाली आणि राजकीय मुख्य विचारप्रवाहात आली. याचा अर्थ ब्रिटनने चार दशकांपासून युरोपीय महासंघाचे सदस्यत्व घेतल्याबद्दलची ती नाराजी होती.

*** महासंघाचे अधिपत्य :**

युरोपीय महासंघात सामील होऊ इच्छिणाऱ्या सभासद देशांना या महासंघाचे कायदे, बंधने, न्यायालये आणि ब्रुसेल्स येथील प्रचंड मोठी नोकरशाही या सर्वांचे अधिपत्य मानलेच पाहिजे. अशी अट आहे. या अटीमुळे अनेक ब्रिटिश नागरिकांना आपल्याला लगाम घातल्यासारखे वाटते.

*** सरकारचे दुर्लक्ष :**

युरोपमधील घरांची अनुपलब्धता, गोऱ्या कर्मचारी वर्गाची खराब शैक्षणिक कामगिरी आणि

सार्वजनिक सेवांचा वित्तपुरवठा ही कारणे मूळ आहेत. त्यांच्याकडे कुणीच लक्ष देत नाही. सरकार या मूळ प्रश्नाकडे लक्ष देण्यात अपयशी का ठरली, याची कारणे शोधणे अवघड नाही.

**ब्रिटनने युरोपीय महासंघात राहावे यासाठीचे समर्थन :**

* ब्रिटन बाहेर पडल्याने येथील अर्थव्यवस्थेवर कसा दुष्परिणाम होईल आणि ब्रिटिश कुटुंबे कशी कायमची आता आहेत, त्यापेक्षा जास्त गरीब होतील यावर समर्थक भर देतील. मतदानाच्या पृथ:करणावरून तरूण मतदारांना ब्रिटनने युरोपीय महासंघात राहावे, असे वाटत होते, तर वृद्ध मतदारांना ब्रिटनने बाहेर पडावे असे वाटत होते, हे स्पष्ट दिसून येते.

* लंडन हे महत्त्वाचे जागतिक आर्थिक केंद्र आहे. हे प्रस्थापित करण्यासाठी महासंघाचे सदस्यत्व असणे महत्त्वाचे आहे. यावर बहुसंख्य अर्थतज्ञांचे मतैक्य आहे. त्यातून ब्रिटनने बाहेर पडणे म्हणजे हा दर्जा व त्याबरोबर लठ्ठ पगार देणारे जॉब्स गमावून बसण्याचा धोका आहे.

* ब्रिटनमधील गुंतवणूक फक्त ब्रिटिश बाजारपेठेपुरती मर्यादित नसते. महासंघाच्या बाजारपेठेचे प्रवेशद्वार म्हणून त्याकडे पाहिजे जाते. हे सारे बंद झाल्याने या देशातील गुंतवणूक तितकीशी आकर्षक राहणे शक्य नाही. नवीन भांडवल येणे अवघड होईल; पण गुंतवलेले भांडवलही बाहेर जाण्याचा धोका आहे. ह्युंदाई, फोर्ड, नेसले आपापले कारखाने बंद करण्याच्या मनस्थितीत आहेत, हेही गंभीर वास्तव आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम रोजगार निर्मिती, शेअर मार्केट व ब्रिटिश पौडांवर होणे शक्य आहे.

* १८ ट्रिलियन डॉलरची जीडीपी आज जगात सर्वात मोठी मानली जाते. जागतिक अर्थव्यवस्थेवर महासंघाचा त्यामुळे दबदबा आहे. व्यापारात आपल्याला अनुकूल अटी पदरात पडून घेण्यासाठी त्याचा वापर महासंघ करून घेत असतो. बाहेर पडल्यानंतर महासंघाच्या या एकत्रित ताकदीतून मिळणाऱ्या फायद्यापासून ब्रिटन वंचित राहील. ब्रिटनची बाजारपेठ आक्रसण्याचाही मोठा धोका आहे.

* ब्रिटनची लोकसंख्या ६.५ कोटी तर महसंघाची ५० कोटी आहे. महासंघाचा सभासद म्हणून ब्रिटनला स्वत:च्या लोकसंख्येच्या आठपट मोठी बाजारपेठ आयती मिळते. महासंघाच्या ५० कोटी लोकसंख्येच्या या बाजारपेठेवर पाणी सोडणे व्यवहार्य ठरणार नाही. बाजारपेठा युरोपच्या बाहेरही आहेत; पण त्यासाठी प्रारंभापासून सुरूवात करावी लागेल व त्याचा खर्चही वाढेल.

**ब्रेक्झिटचे परिणाम :**

'ब्रेक्झिट' ही एक क्लिष्ट आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. युरोपियन महासंघातून बाहेर पडण्याच्या ब्रिटनमधील जनतेच्या निर्णयाचे दूरगामी परिणाम अर्थकारण, समाजकारण आणि राजकारणावर होणार आहे.

**युरोपीय महासंघावरील परिणाम :**

* १९९३ मध्ये जागतिक जीडीपीत महासंघाचा वाटा ३६ टक्के होता तो २०१५ मध्ये २२ टक्क्यांवर आला आहे. यात घसरण झाल्याचे दिसते.

* ब्रेक्झिटच्या निर्णयामुळे ब्रिटनमधील स्कॉटलंड आणि उत्तर आर्यलड या प्रांतांमध्ये ब्रिटनमधून बाहेर पडत युरोपीय संघाबरोबर राहण्याची मागणी पुढे येत आहे. असे झाल्यास ग्रेट ब्रिटनच्या ऐक्याबाबत गंभीर प्रश्नचिन्हे उपस्थित होतील. इंग्लंडपाठोपाठ फ्रान्स व नेदरलँड यांसारखे तुल्यबळ आणि ग्रीससारखे कमकुवत देश युरोपीय संघातून

भांडवल मिळवणे अवघड होईल. त्याचबरोबर आंतरयुरोपियन व्यापार जो आयात करमुक्त होता तो आता करपात्र होणार आहे.

* सध्या ब्रिटनमधून होणाऱ्या निर्यातीपैकी ४५ टक्के निर्यात युरोपीय महासंघाला जाते. या व्यापारात निर्यात होणाऱ्या कुठल्याही मालावर आज आयात कर भरावा लागत नाही. पण 'ब्रेक्झिट'नंतर मात्र प्रत्येक मालावरील उत्पादकाचा ब्रिटिश पत्ता ही एक धोंडच बनेल. सिटी बँक ग्रुप आणि जेपी मॉर्गन वेस कंपनी यांनी आताच ताकीद देऊन ठेवली आहे, की 'ब्रेक्झिट'नंतर त्यांनाही आपल्या आर्थिक व्यवहारातील काही भाग ब्रिटनबाहेर युरोप खंडात हलवावा लागेल.

**भारतावरील परिणाम :**

* भारतीय कंपन्यासाठी ब्रिटन हे युरोपचे प्रवेशद्वार बनले आहे. ब्रिटनमध्ये ८०० भारतीय कंपन्या असून यामध्ये १ लाख भारतीय कामगार काम करतात परंतु या कंपन्याचे ९५ टक्के कामगार ब्रिटीश असल्याने भारताला आर्थिक तोटा होणार नाही.

* स्टर्लिंग पौंड दर घसरल्याने भारतीय विद्यार्थ्यांना ब्रिटनमध्ये शिक्षण घेणे स्वस्त होणार आहे.

* आयटी क्षेत्रातील भारतीय कंपन्यांची ६ ते १८ टक्के कमाई ब्रिटनमधून होते. त्यामुळे आयटी उद्योगांच्या १०८ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीवर परिणाम होणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. या कंपन्यांना ब्रिटनमुळे युरोपमध्ये सवलत मिळत होती. ती आता बंद होणार असल्यामुळे त्याचा फटका या कंपन्यांना बसणार आहे. इंग्लंडमध्येच नव्हे तर भारतातही आता बेकारी वाढण्याची शक्यता जास्त आहे. कारण अनेक कंपन्यांना ब्रिटनमधील आपला कारभार गुंडाळावा लागणार आहे. नव्याने करार करावे लागतील.

* भारतस्थित ज्या कंपन्या व क्षेत्रांचा ब्रिटनमधील गुंतवणुकीशी संबंध आहे. त्यांच्यावर जो नकारात्मक परिणाम होईल. कमी जोखमीच्या सोन्यासारख्या अॅसेटसमध्ये अधिक गुंतवणूक होऊन देशातील इक्विटी बाजारपेठेतील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर बाहेर जाण्याचा धोका आहे. एकूण बाजारपेठ अनिश्चिततेच्या भोवऱ्यात राहील. त्यांचा परिणाम देशात येणाऱ्या भांडवलाच्या ओघावर होईल. इतर युरोपीय देशांच्या तुलनेत भारताची इंग्लंडमध्ये मोठी गुंतवणूक आहे. एफडीआयबाबत आपण ब्रिटनचा तिसरा मोठा गुंतवणूकदार देश आहेत. त्यामुळे युरोपियन बाजारपेठेत प्रवेशाची संधी ही 'युके'मध्ये येणाऱ्या भारतीय कंपन्यांच्या दृष्टीने मोठी असते. ही संधी उरली नाही तर भावी गुंतवणुकीवर त्याचा परिणाम होणे अपरिहार्य आहे.

* ईयु (ब्रिटनसहित) हा भारताचा प्रमुख व्यापारी भागीदार आहे. यामध्ये ४८ बिलियन निर्यात व ६५ बिलियन डॉलर्सच्या आयातीचा समावेश आहे. फक्त ब्रिटनशी भारताचा व्यापार ९ बिलियन डॉलर्सचा आहे.

* ब्रिटन ही भारतीय आयटी कंपन्याची दुसऱ्या क्रमांकाची बाजारपेठ आहे. टाटा मोटर्स, टाटा स्टील, भारत फोर्ज, हिंदाल्को, टीसीएस, इम्फोसीस, टेक महिंद्रा, एचसीएल, माईडट्री या भारतीय कंपन्यांचा प्रमुख वाटा या व्यापारात आहे.

**जागतिक परिणाम :**

* जगभरातील शेअर बाजारांवरही या निर्णयाचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. सार्वमतातून घेण्यात आलेल्या या निर्णयाचा सर्वांत मोठा परिणाम युकेमध्ये काम करणाऱ्या कौशल्यपूर्ण नोकरदारांवर होणार आहे. यात अनेक युरोपियन महासंघाचे नागरिक आहेत. ज्यांना आजवर वेगळा

व्हिसा घ्यायला लागत नव्हता.

* युरोपिय महासंघाच्या अर्थव्यवस्थेपैकी १/६ भाग ब्रिटनचा आहे. 'ब्रेक्झिट' म्हणजे कॅलिफोर्निया फ्लोरिडा यांना अमेरिकन अर्थव्यवस्थेपासून तोडण्यासारखे आहे. या अस्थैर्याचा परिणाम अमेरिकन अर्थव्यवस्थेवरही होऊ शकतो.

* जगात सोने - चांदीचे भाव वाढायला लागले आहेत व ते अजून वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. अमेरिकेवर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा विचार केला, तर शेअर बाजार युरोपच्या तुलनेमध्ये वाढेल, अमेरिकी डॉलर मजबूत होईल आणि स्विस फ्रँक आणि येन हे चलन मजबूत होतील. तसेच आशियाई देशांचा विचार केला तर कंबोडिया, व्हिएतनाम आणि हाँगकाँग यांची ब्रिटनला निर्यात जास्त असल्यामुळे हे देश सोडले तर अन्य आशियाई देशांवर फारसा परिणाम व्हायला नको. इतर युरोपीय देशांवर परिणाम झाल्याने त्याचा आशियाई देशांच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. इतर देशांच्या मध्यवर्ती बँका त्यांच्या देशाची चलने स्थिर ठेवण्याच्या हेतूने, त्यांची पतधोरणे तात्पुरती 'जैसे थे' ठेवतील.

**इतर राष्ट्रावरील परिणाम :**

* आता ब्रिटनने काडीमोड घेतल्यामुळे अनेक युरोपियन महासंघातील देश अडचणीत येणार आहेत. कारण युरोपियन महासंघाकडून सदस्य देशांची सदस्य देशांना मदत मिळत असते. यात आयर्लंडमधील शेतकऱ्यांना महासंघाकडून मिळणारी सबसीडी बंद होईल. पोलंड, रूमानिया, लिथआनिया, ग्रीस देश अशा सबसीडींवरच जगत आहेत, त्यांचा बोजा आता उर्वरित देश कसा उचलणार आहे? ब्रिटनच्या युरोपियन युनियन सोडण्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. अनेक युरोपियन प्रोजेक्ट गोत्यात येणार आहेत.

**मूल्यांकन :**

युरोपियन युनियनमध्ये ब्रिटन भौगोलिक, आणि आर्थिकदृष्टया तुलनेने लहान देश आहे. ब्रेक्झिट हा वित्तीय धोरणाचा आफ्टरशॉक आहे. ब्रेक्झिट हा प्रामुख्याने आर्थिक आघाडीवर जास्त चर्चिला गेल्याचे जाणवते. परंतु ब्रेक्झिट ही घटना आर्थिकपेक्षा राजकीय दृष्टीकोनातून पाहणे जास्त आवश्यक आहे. एकमेकांशी गळेकापू शस्त्रास्त्र स्पर्धा करणाऱ्या राष्ट्रांना एक पंक्तीत बसवण्याची किमया महासंघाने केली. ब्रेक्झिटमुळे महासंघाच्या परिणामकारक कार्यकाळावर व भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ब्रिटनचे साम्राज्यवादी पंतप्रधान सर विन्स्टन चर्चिल यांचे "If Britain must choose between Europe & the open sea, She must always choose the open sea" हे वाक्य पुरेसे आहे.

**संदर्भसूची :**


१) बुलेटीन ऑफ युनिक अकॅडमी, पुणे ऑगस्ट, २०१६.

२) लोकमत : जून १७, २०१६, जून २२, २०१६

३) सकाळ : जून २१, २०१६, ऑगस्ट ५, २०१६

४) पुढारी : जून २२, २०१६

५) प्रहार : जून २४, २०१६ जून २९, २०१६

६) प्रभात : जुलै ०३, २०१६

७) लोकसत्ता: जून २५,२०१६, डिसेंबर ६, २०१६


◆◆◆

RNI-MAHMUL03348

ISSN : 2395-759X

An International Indexed, Refereed, Peer Reviewed,
Interdisciplinary, Multilingual, Multisubject, Monthly Research Journal

Vol.-II ▪ Issue-XII ▪ December - 2016

**Akanksha...**
New Directions & Challenge.

आकांक्षा

# आकांक्षा...

आणि आव्हाने.

▪ **Editor - In - Chief**
***Prof. Mayur Bandu Lahane***

**Published by :- Akansha Tankalekhan Multipurpose Society**
Near Ram Mandir, Peth Pura, Hiwarkhed (Rup.), Tq. Telhara, Dist. Akola, (MH) 444 103

# ३.'महाराष्ट्रातील जल-समस्या : कारणे व उपाय''

प्रा. एम. के. नन्नावरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, अकोट

ÀÑ¸Ì;Ì :

मानवी जिवणासाठी पाणी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. मानवाचा स्थूल देह सृष्टीतील पंचमहाभूताचे व्यष्टीरुप समजले जाते या पंचमहाभूतापैकी हे एक तत्व आहे. सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी पिण्याच्या पाण्याला महत्वाचे स्थान आहे. जीवसृष्टी ही पृथ्वीला लाभलेली निसर्गदत्त देणगी आहे. पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या अस्तित्वाच्या दृष्टीने जलसंपत्ती ही आवश्यक गरज असुन जलस्त्रोतांच्या सभोवतालीच वनस्पती व प्राणीजीवन विकसीत झाल्याचे आढळून येते. मानवाचे देखील जलस्त्रोतांच्या सभोवतालीच आपली वस्ती केली असून जगातील न्यूयॉर्क, बिजिंग, मुंबई, कोलकत्ता इत्यादी प्रमुख शहरे ही नद्यांच्या तिरावर वसलेली आहेत. पृथ्वीच्या सुमारे ५१० दशलक्ष चौ.कि.मी. पृष्टभागाच्या म्हणजेच ७० ते ८०% भाग पाण्याने व्यापलेला असून पृथ्वीवर एकूण ४,८८,९०,५०० अब्ज टीएमसी पाणी आहे. पृथ्वीवर उपलब्ध असणाऱ्या एकूण जलसंपत्तीपैकी ९७ .२४% पाणी महासागरामध्ये असून ते पिण्यायोग्य नाही, उत्तर व दक्षिण धृवावर हिमनग आणि हिमनद्यामध्ये २.१४% शुध्द जलसाठा आहे परंतु तो वापरता येणे अशक्य आहे. नद्यामध्ये एकूण पाण्याच्या केवळ ०.००१% पाणी आहे. तर गोड्या पाण्याच्या सरोवरात ०.००९% पाणी आहे.

प्रस्तावणा :-

आज पाण्याचा प्रश्न हा पर्यावरणीय समस्या नसून ते पूर्णत: नियोजनाच्या अभावामुळे निर्माण झालेला प्रश्न आहे. पृथ्वी, हवा, आकाश आणि अग्नी यांच्या सहयोगातून पाणी पृथ्वीवरील जीवाचे संगोपन करत आले आहे. २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर पाणी टंचाईची समस्या उग्ररुप धारण करु पाहत आहे. पृथ्वीचा पृष्ठभाग जरी ७५% पाण्याने व्यापलेला असला तरी त्यापैकी २% पाणी जवळपास गोडे आहे व हे गोडे पाणी समाजाच्या विविध उपयोगासाठी उपलब्ध आहे. माणसाच्या शरीरात साधारणपणे ७०% पाणी आहे हे पाणी १५% कमी झाले तरी मृत्यू निश्चित आहे. नैसर्गिक आपत्ती, अवेळी पाऊस, अनियमितता व जमिनीची धुप यामुळे पात्राची पातळी उथळ होते व जमिनीची पाणी साठवण्याची क्षमता कमी होते. आज वाढत्या लोकसंख्येमुळे पिण्याच्या पाण्याचे संकट हे एक मुख्य कारण आहे. पाण्याच्या साठ्याच्या प्रमाणापेक्षा लोकसंख्या वाढली आहे पावसाचे पाणी कमी झाल्यामुळे नद्या, नाले, विहिरी यांच्या पाण्याची पातळी घटलेली आहे व शुध्द पाण्याचे स्त्रोत कमी होत आहे. पिण्याच्या पाण्याच्या गंभीर प्रश्नामुळे येणारे दशक पाणी संकटाचे असू शकते असे म्हणणे वावगे ठरु नये त्यासाठी २१ व्या शतकात विकासाच्या प्रक्रियेत पाण्याची उपलब्धता हा दुर्मिळ भौतिक साधनसंपत्ती म्हणून अतिशय महत्वाची भूमिका वठविणार आहे. थोडक्यात समृध्दी आणि प्रगती सर्वस्वी पाण्यावर अवलंबून आहे.

ÌÀÉ¸ÌÁ"¸Ì-ÌÍÀÁ -ÌÀ ÀÌ ÌÀÌ :-

राज्यात वारंवार जलसंकट निर्माण होत असून सध्या दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. या





समस्या पुढील प्रमाणे ;

१) जलसंपत्तीचे विषम वितरण :

मान्सून पर्जन्य हा महाराष्ट्रातील जलसंपत्तीचा एकमेव स्त्रोत आहे परंतु महाराष्ट्राच्या पश्चिमेस असणाऱ्या सह्याद्री पर्वत रांगामुळे अरबी समुद्रातून येणारे नैऋत्य मान्सून वारे अडविले जातात त्यामूळे कोकण किनारपट्टीवर २००० ते ३५०० मि.मी. पाऊस पडतो. तर सह्याद्री पर्वताच्या पूर्वेस असणाऱ्या पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातील अनुक्रमे ५०० ते ७५० मि.मी. इतका अत्यल्प पाऊस पडतो.

२) सुयोग्य नियोजनाचा अभाव :

भारताच्या १४.५९% पाणी महाराष्ट्रात उपलब्ध असून देशाच्या तुलनेत २९.१०% वापरायोग्य पाणी एकट्या महाराष्ट्रात उपलब्ध आहे. लोकसंख्येतील वाढ, शेतीक्षेत्रातील हरितक्रांती, पायाभूत सुविधांचा विकास, औद्योगिक प्रगती यामुळे पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणत वाढत गेली परंतु त्या प्रमाणात जलसंपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन होऊ न शकल्याने अद्यापही ८२% क्षेत्र कोरडवाहू व ५२% क्षेत्र अवर्षण प्रवण आहे.

३) दुष्काळाचे संकट :

राज्यात पुरेशा प्रमाणात जलसंपत्ती उपलब्ध असूनही मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात दरवर्षी अवर्षण परिस्थिती निर्माण होते सध्या राज्यातील १३ जिल्ह्यात सरकारने दुष्काळ जाहीर केला असून यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली व सोलापूर या जिल्ह्यांचा तर मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद व नांदेड या जिल्ह्याचा समावेश आहे. याशिवाय उत्तर महाराष्ट्रातील जळगाव व बुलढाणा या जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यातील १३,००० गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत असून यापैकी १५८६ गावे आणि ४३०५ वाड्यांना मिळून २०२० टँकरने पिण्याचे पाणी पुरविले जात आहे. राज्यातील मराठवाड्यात दुष्काळाची स्थिती अत्यंत भयावह असून तेथे ८५४० गावांप्रैकी ३२९९ म्हणजेच ३८.६३% गावे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केली आहेत. यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यांत सर्वाधिक म्हणजे ११७६ गावांचा समावेश आहे. राज्यातील दुष्काळी भागातील पिके जळून खाक झाली असून फळबागा उजाड झाल्या आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी माणसां बरोबरच प्राण्यांची मोठी तडफड होत आहे. पशुधनाच्या सुरक्षेसाठी सरकारने राज्यात ४८८ जनावरांच्या छावण्या सुरु केल्या असून यात ४,१४,२०५ जनावरे दाखल करण्यात आली आहेत.

४) नागरीकरण व औद्योगिरकणासाठी पाण्याची वाढती मागणी :

वाढती लोकसंख्या तसेच उच्च राहणीमान, शिक्षण, रोजगार व पाण्याचे दुर्भिक्ष्य या कारणांमुळे ग्रामीण लोकसंख्येचे शहरी भागात होणारे स्थलांतरण यामुळे शहरी भागात पिण्याच्या, औद्योगिक वापर तसेच घरघुती वापरासाठीच्या पाण्याच्या मागणीत मोठी वाढ होत आहे. २००१-०२ मध्ये राज्यात सिंचनसाठी ६९.२९% तर बिगर सिंचनासाठी ३०.७१% पाण्याचा वापर केल्याचे दिसून येते. तर २०१०-११ मध्ये सिचंनासाठी पाणी वापरात ५६.५६% पर्यन्त घट झाली असून बिगर सिंचनासाठीच्या पाणीवापरात ४३.४४% इतकी वाढ झाल्याचे आढळून आले. राज्यातील उद्योगांना प्रतिदिन १९४ कोटी लिटर पाण्याचा वापर असून सध्या १२८.६ कोटी लिटर पाण्याचा वापर औद्योगिक क्षेत्रातून केला जातो. महाराष्ट्रातील शहरीकरण व औद्योगिकीकरणाच्या प्रमाणातील वाढी बरोबरच शेतीचे पाणी हे शहरे व उद्योगधंद्यासठी राखून ठेवले जात आहे याचा परिणाम म्हणून राज्यातील सिंचन क्षेत्रात उपेक्षित वाढ घडून येत नाही.

५) जलसिंचन क्षमतेचा अपुरा वापर :

राज्य जलसंपदा विभागाद्वारे निर्मित सिंचनक्षमता व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र यात मोठी तफावत दिसून येते. राज्यातील असंख्य जलसिंचन प्रकल्पांची कामे अपुर्ण असल्याने तसेच कालवे, वितरिका यांची कामे रखडल्यामुळे प्रकल्पांची सिंचनक्षमता पूर्णपणे वापरली जात नाही प्रकल्प पूर्णतेस विलंब झाल्याने एकीकडे प्रकल्पांच्या खर्चात वाढ (उदा. गोसीखुर्द प्रकल्प) होत जाते तर दुसरीकडे सिंचन क्षेत्रात अपेक्षित वाढ घडून येत नाही. तसेच सिंचन प्रकल्पामध्ये साचलेल्या गाळामुळे अनेक प्रकल्पांची पाणी साठवणक्षमता कमी झाली आहे.

६) पाण्याचा अयोग्य व बेसुमार वापर :

महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील गावात लोकांना पिण्याच्या हंडाभर पाण्यासाठी ४-५ मैलापर्यंत वणवण करावी लागते तर शहरामध्ये आठवड्यातून कधी पंधरवाड्यातून तर काही ठिकाणी महिण्यातून एकदा नळाला पाणी येते शहरातील लोकसंख्यावाढ व पाण्याच्या बेसुमार वापरामुळे जलस्त्रोतांमधील शहरांसाठीच्या पाणी वापराचे आरक्षण वाढत असून ग्रामीण भागातील शेती तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. अद्यापही बागायती भागातील शेतकरी उसासारख्या पिकांना मोकाट पध्दतीने बेसुमार पाणी देतात त्यामुळे पाण्याचा अपव्यय तर होतोच परंतु जमिणीच्या वापराच्या थरांत क्षारांचा अतिरिक्त संचय होऊन पिकांची उत्पादकता घटते व शेवटी जमिणी नापिक बनतात.

७) पाण्याची दरडोई उपलब्धता लोकसंख्येच्या विषम प्रमाणात उपलब्ध :

महाराष्ट्रातील लोकसख्येचे प्रमाण वाढते आहे त्यामुळे आज उपलब्ध असलेले पाणी लोकांना समानतेने उपलब्ध होत नाही त्यामुळे पाणी टंचाई जाणवते.

८) प्रचंड जंगलतोड :

महाराष्ट्रात पंचड वृक्षतोडीमुळे नद्यांना अनियंत्रित पुर येवून वाहते पाणी समुद्रात जावून मिळते व भुगर्भात पाणी मुरत नाही. पाण्याच्या जमिनीत मुरण्याच्या प्रमाणात सध्या महाराष्ट्रात १ ते ५०% एवढे पुनर्भरण होत आहे. महाराष्ट्रात पुर्णभरणाचा दर १५% एवढा आहे तर कोकण, सह्याद्री व पुर्वे कडील पाणेरी भागात जंगल असल्यामुळे १ ते ५% एवढेच पुर्नभारण होते. हिराकुंड, भाक्रा या सारख्या मोठ्या प्रकल्पांमुळे क्षारपड जमिनीचे प्रश्न व पाणी साठवून क्षेत्रामुळे भूकंप लहरीचे प्रश्न सुध्दा निर्माण होत आहे.

उपाययोजना :- राज्यातील जलसमस्या ही दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत चालली असून या समस्येची तीव्रता कमी करण्यासाठी पुढील उपाययोजना आवश्यक आहेत.

१) जलसंधारण :

दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून जलसंधारणाकडे पाहिले जाते. राज्यातील राळेगणसिध्दी (जि. अ. नगर), शिवणी (जि. जालना) व निढळ (जि. सातारा) या गावांनी पाणलोटक्षेत्र विकासाच्या माध्यमातून जलसंधारणा व्दारे जलसमस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढला आहे. तसेच धुळे जिल्ह्यातील शिरपुरने राज्यासमोर जलसंवर्धन व जलव्यवस्थापनाचा १ आदर्श घालून दिला आहे या तालुक्यातील ३५ गावांनी भूवैज्ञानिक सुरेश खानापुरकर यांच्या पुढाकाराने विहिरींचे पुनर्भरण, नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करुन ठिकठिकाणी बंधारे घालून पाणी अडवा पाणी जिरवा हे निती प्रत्यक्षात आणली व या परिसराचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटला. अशा प्रकारची जलसंधारणाची कामे राज्यात ठिकठिकाणी झाल्यास पडणाऱ्या पावसाच्या प्रत्येक थेंबाचा वापर करता येऊ शकेल.

२) शेती क्षेत्रात पाण्याचा काटकसरीने वापर :





शेती क्षेत्रातील पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन, सूक्ष्म जलसिंचन या पध्दतीचा अवलंब करावा. त्यासाठी फळबागा बरोबरच सर्व प्रकारच्या पिकांना गरजे प्रमाणे ठिबक, तुषार व सुक्ष्म जलसिंचनासाठी शेतकऱ्यांना खर्चाच्या ७५ ते १००% शासकीय अनुदान उपलब्ध करुन द्यावे. पाण्याच्या बाष्पीभवनाद्वारे होणारा अपव्यय थांबविण्यासाठी फळझाडांच्या भोवताली वनस्पतीजन्य अथवा पॉलीथिनच्या आच्छादनाचा वापर करावा. तसेच टंचाई काळात झाडांच्या फांद्या व पानांची संख्या मर्यादित ठेवावी त्यामुळे पानांद्वारे होणाऱ्या बाष्पीभवनात घट होऊन कमी पाण्यातही फळबागा तग धरु शकतील.

३) जलसाक्षरता :

पाण्याची उपलब्धता आणि गरज लक्षात घेऊन परिसरात उपलब्ध असणाऱ्या पाण्याचा काटकसरीने व सुयोग्य वापर करण्याची माहिती व प्रत्यक्षातील कृती याला जलसाक्षरता असे म्हणता येईल. पाण्याची बचतही सर्वात मोठी संपत्ती आहे अशी समाजाची मानसिकता होणे गरजेचे आहे. कारण जलसाक्षर समाजच भविष्यात विकासाकडे झेप घेऊ शकतो. परंतु त्यासाठी सरकार बरोबरच स्वयंसेवी संस्था, [illegible] विविध संस्था व संघटनांनी जलसाक्षरतेच्या दिशेने पाऊले उचलणे आवश्यक आहे.

४) लोकसहभाग वाढविणे :

लोकसहभागाचा अभाव असल्याने जलसिंचनावर १७ हजार कोटी रुपये खर्च होऊनही [illegible] सिंचन स्त्रोतांची व सिंचन क्षेत्राची फारशी प्रगती होऊ शकली नाही. जलसंधारण, [illegible] भूजलपुनर्भरण, शेततळी, पाझर तलाव इत्यादींचे महत्व पटवून देवून व जागृती करुन या सर्व प्रकारात लोकसहभाग वाढविणे अत्यावश्यक आहे तरच पाण्याचा योग्य, काटकसरीने व नियोजनबध्द वापर करणे शक्य होईल. यासाठी वृत्तपत्रे, आकाशवाणी, दुरदर्शन या माध्यमांद्वारे व्यापक [illegible] घडवून आणणे आवश्यक आहे. यापूर्वीच ग्रामस्वच्छता व तंटामुक्ती मुक्ती अभियानाच्या धर्तीवर [illegible] व जलसमृध्द ग्राम ही अभियाने राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.

५) सिंचन क्षमतेचा पूर्ण वापर :

राज्यातील साठवण क्षमता विकसित झालेल्या सर्व प्रकल्पांच्या निर्मित सिंचन क्षमतेचा पूर्ण वापर करण्यासाठी कालवे, वितरिका यांची अपूर्ण असलेली कामे प्राधान्याने करुन निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र यातील अंतर कमी करणे गरजेचे आहे. याशिवाय सिंचन प्रकल्प हे निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यासंबंधीचे बंधन ठेकेदारांवर घालून कालक्षय झाल्यास संबंधित ठेकेदाराला दंड आकारावा व प्रसंगी त्याचा परवाना रद्द करण्यात यावा. याशिवाय पावसाळ्याच्या दिवसात जलसाठ्यातील पाणी नद्यांच्या पात्रात सोडण्याऐवजी ते कालव्यांच्या माध्यमातून लाभक्षेत्रातील तळी, पाझर तलाव, लघु व मध्यम जलसिंचन प्रकल्प यात सोडून पाण्याच्या टंचाईच्या काळासाठी साठा करुन ठेवावा.

६) पाणी अंकेक्षण (जललेखा परिक्षण) :

पाण्याचा काटकसरीने वापर होण्यासाठी नागरी भागात नळ जोडणीस मीटर बसून मीटरप्रमाणे पाणी, पाणीपट्टी आकारावी जेणेकरुन लोक विजेप्रमाणे पाण्याचा जपून वापर करतील. तसेच अधिक पाणी वापरकर्त्यांवर अधिक दराने कर आकारणी करावी आणि उपलब्ध होणाऱ्या निधीतून सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा उभारावी. याशिवाय सर्व जलसिंचन प्रकल्पांना जललेखा परिक्षण बंधनकारक करावे तसेच पाणी पुरवठा संस्थाना घनमापन पध्दतीने पाणी मोजण्याची साधने पुरवावीत त्यामुळे पाण्याचा वापर काटकसरीने केला जाईल.

७) लोकसंख्येवर नियंत्रण :

आज देशाच्या लोकसंख्येत वाढ झाली आहे ह्या प्रचंड लोकसंख्येत पाणी मिळणे आवश्यक आहे. देशाच्या प्रमाणापेक्षा राज्याच्या लोकसंख्या वाढीचे प्रमाण जास्त आहे म्हणून लोकसंख्या नियंत्रित करणे आवश्यक आहे.

८) दुषित होणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करणे :

राज्यातील औद्योगिक कारखान्यातून निसृत होणाऱ्या पाण्यावर व मलप्रवाहावर प्रक्रिया करून पाण्याची बचत करता येते. हे काम औद्योगिक विकास महामंडळामार्फत उभारावे व सक्तीचे करावे.

९) पाणी साठवण्याच्या पध्दतीवर जोर :

राज्यातील पाण्याची पातळी जास्त खोल न जाऊ देता आज उपलब्ध असलेल्या पाणी साठ्याचा आणखी कसा उपयोग होऊ शकेल व पाणी साठवण्यासाठी सुयोग्य पध्दतीवर भर द्यावा लागेल. आज [illegible] कुडामध्ये व गुजरातमधील [illegible] जिल्ह्यात [illegible] ह्या उपाय विहिरीत पाणी साठविले जाते. घराच्या छतावर पडणारे पाणी साठवून ठेवून विशिष्ट पध्दतीने त्याचा वापर व्हायला हवा. [illegible] आपल्या शब्दात लिहितात. 'पाणी पडत असेल तर त्याला चालायला लावा [illegible] असेल तर त्याला थांबायला लावा आणि ते थांबले तर त्याला जमीनीत जिरवा' अशा [illegible] प्रत्यक्षात उपयोग व्हायला हवा.

१०) वृक्षांची जोपासना व रोजगार :

जे मजूर [illegible] करतात त्यांच्यासाठी झाडे लावण्यासाठी खड्डे खोदणे, रोपे लावणे यांची कामे दिल्यास त्यांचा प्रश्न सुटेल हीच झाडे मोठी झाली तर कोणत्याही योजना सम्बन्धी या परिसरात राहणाऱ्या [illegible] आहे त्यांच्याकडून वांबू विकत घेणे व त्याच्या वेगवेगळ्या वस्तू तयार करून विकणे म्हणजे काम मिळेल. उदनिर्वाहाचा प्रश्न सुटू शकतो.

## सारांश :-

पाणी हे संसाधन [illegible] मानवाला [illegible] दिलेली देणगी आहे. पाणी वापर नियोजनाचा अभाव [illegible] दुष्काळासारखी आपत्ती आली आहे. पाण्याचे दुर्भिक्ष संकटाचा सामना करताना सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे. [illegible] येणारे दशक पाणी संकटाचे म्हणून ओळखले जाईल [illegible] नाही. त्यात महाराष्ट्रात या प्रश्नाला गांभिर्याने घेतले जात आहे. आपला देश, राज्य, [illegible], [illegible] असूनही त्यामुळे पिण्याचा पाण्याचा तुटवडा जाणवायला [illegible] तर अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागेल. ही समस्या दूर करण्यासाठी आपल्या प्रत्येकाजवळील आत्मविश्वास, [illegible], प्रचंड बौद्धीक क्षमता आणि मनोबल याचा उपयोग करून जलाचे महत्व लक्षात घेता हा प्रश्न सहज सुटू शकतो.

## संदर्भ :-

१) [illegible] महाराष्ट्राची [illegible] अर्थव्यवस्था - प्रा. डॉ. जे. एफ. पाटील
२) मराठी विश्वकोष
३) [illegible]
४) [illegible] पुणे [illegible]
५) [illegible] पुणे [illegible]
6) [illegible]





# 4. "IMPACT OF E-ACCOUNTING"

Prof. Avinash Ramkrishna Pawar
Assistant Professor,
Shri Shivaji College, Akot.

**Abstract:**

Accounting is the information system that measures business activity, processes the data into reports, and communicates the results to decision makers, which could be individuals, Business, Investors, or Tax Authorities. Accounting professionals have to face a number of situations and problems while performing the accounting and audit of companies operating in electronic environment.

**Introduction:**

The introduction of advanced information technology (IT) has changed the way that mines"; or organizations conduct their businesses The capabilities of IT have led to the Munich of various information systems, such as, accounting information system (AIS), manufacturing resource planning system (MRP) and human resource system (HRM) m We the various aspects of a business.

The proper use ρf this technology may create competitive advantage for most Business and organizations in all fields, including accounting. As a single largest user of IT and purveyor of information for the organization, the evolution of IT in accounting has transformed the accounting information flow within and outside the organizations. Previous inefficient traditional paper-based manual accounting methods caused some problems, such as, wrong data entry, slow and inefficient task performance and massive utilization of paper products. Lack of data security was also a major issue. But, the emergence of computer based IT has changed not only the accounting profession itself, but also the accounting information systems and practices. IT as a key resource in accounting and financial information processing has enabled the tedious task of manual bookkeeping to be substantially eliminated through the implementation of computerized accounting information systems. The accounting-related task performance or task performance outcome

www.marthpari.org

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

# अर्थसंवाद

Reg No 31918/77 / ISSN 0973-8452 एप्रिल-जून २०१७ / खंड ४१ अंक १

## अनुक्रमणिका

१. राहुल म्होपरे : **संपादकीय** .................................... ३
२. जे. एफ. पाटील : **शेती उत्पन्नावर कर शक्याशक्यता** ......... ६
३. एम. एन. शिंदे
**...आणि केन्सच्या अर्थशास्त्राला तडा गेला** ................. १०
४. आप्पासाहेब पुजारी
**विकीरणक सिंचन पद्धती व पाण्याची उत्पादकता** .......... १६
५. संतोष कदम
**महाराष्ट्रातील तूर पिकाच्या किमतीतील कल आणि पूर्वानुमान** २६
६. अशोक दि.खाचणे, दीपक चौधरी
**धुळे जिल्हा नियोजन समितीच्या वार्षिक योजनांचा अभ्यास** ३६
७. पी. एम. कडूकर
**जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यातून भारतीय कामगार संघटनांसमोरील आव्हाने** .................................... ४१
८. श्रीहरी वामनराव मिसाळ : **भारतातील आर्थिक विषमता** .... ४९
९. चंद्रकांत जाधव
**कोल्हापूर शहरातील बांधकाम मजुरांच्या समस्या : एक अभ्यास** ................................................ ५५
१०. आशालता देवराम सोनवणे
**भारतातील जलव्यवस्थापनासाठी संस्थात्मक बदलांची गरज** ६२
११. नीता सुधाकर वाणी
**महाराष्ट्र शासनाच्या तिसऱ्या महिला धोरणातील महिला उद्योजकांबाबत केलेल्या शिफारशींचे चिकित्सक अध्ययन** . ६६
१२. दीपक विठ्ठल भुसारे :
**पर्यटन क्षेत्र आणि भारतीय अर्थव्यवस्था** ..................... ७२
१३. मोरेश्वर के. मन्नावरे : **विदर्भाचा पर्यटन विकास** ............ ८१
१४. आर. के. नाळे
**पीएच.डी.प्रबंधाचा सारांश** : .................................. ८६
१५. शिवाजीराव भोसले : **अर्थभान : गोळाबेरीज**................. ९२
१६. जे.एफ. पाटील : **अर्थ शब्दांची वाट पाहे** ................... ९५

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव

**सल्लागार मंडळ**
(२०१५-१८)
तेजस्विनी मुडेकर
अरूण पिसे
राजेंद्र गव्हाळे
विजय भोपाळे

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबर समोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

# विदर्भाचा पर्यटन विकास

**मोरेश्वर के. नन्नावरे** †
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट*

## प्रस्तावना

भारताचे पंतप्रधान स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पर्यटन ही राष्ट्रीय एकात्मता आणि आंतरराष्ट्रीय बंधुत्व यांची गुरूकिल्ली आहे असे म्हटले आहे. त्याची प्रचिती आजच्या संगणक युगात, खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या युगात येत आहे. माणसाने प्राचीन काळापासून पर्यटनाच्या माध्यमातून नवनवीन गोष्टींचा, स्थळांचा, प्रदेशाचा व देशांचा शोध लावला आहे. म्हणजेच माणसास निसर्गत: पर्यटनाची आवड असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळात पर्यटनाकडे फारसे लक्ष देण्यात आले नव्हते, परंतु स्वातंत्र्यानंतर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत पर्यटनाला चालना देण्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली. १९८२ साली भारत सरकारने पर्यटनाला चालना देण्याची घोषणा केली तर सातव्या पंचवार्षिक योजनेत पर्यटनाला उद्योगाचा दर्जा देण्यात आला. १९९८ मध्ये पर्यटन योजनेच्या आर्थिक बळासाठी पर्यटन वित्त महामंडळाची स्थापना करण्यात आली. या उद्योगासाठी १९९६-९७ या वर्षी असलेली ९० कोटी रूपयांची तरतूद वाढवून १९९७-९८ मध्ये ११०.३५ कोटी रूपये करण्यात आली. ९व्या पंचवार्षिक योजनेत पर्यटन विकासाला विशेष महत्त्व देण्यात आले असून केन्द्रीय अंदाजपत्रकात पर्यटन उद्योगाला विविध सुविधा देण्यात आल्या. एवढेच नव्हे तर डोंगराळ व ग्रामीण क्षेत्रातील हॉटेल योजनांसाठी करांमध्ये सूट देण्यात आली. राष्ट्रीय पर्यटन नीतीच्या मसुद्यात केन्द्र व राज्य सरकार, सार्वजनिक व खाजगी क्षेत्र तसेच पंचायती राज्य संस्था व स्थानिक संस्थांच्या भूमिकांना रेखांकित करण्यात आले. भारताने एकूण जी.डी.पी.च्या ६.६% योगदान देत पर्यटन क्षेत्रात लक्षणीय वाढ केली.

## पर्यटनाचा अर्थ

१९ व्या शतकात 'पर्यटक' हा शब्द प्रचलित झाला. पर्यटक म्हणजे असा एक प्रवासी की जो मनोरंजनाकरिता विविध स्थळांना भेटी देतो. २० व्या शतकात पर्यटकाचा अर्थ वेगळा समजला गेला. कोणताही आर्थिक लाभ न घेता आस्वाद घेण्याचा प्रयत्न, मनोरंजन व सांस्कृतीक ज्ञान घेण्याची वृत्ती ज्या व्यक्तिमध्ये असते तिला 'पर्यटक' असे म्हटले जात असे. पर्यटक या शब्दाचा अर्थ वेगवेगळ्या तज्ज्ञांनी वेगवेगळा दिला आहे. १९९३ मध्ये एफ. डब्ल्यू. ओगलीव्ह यांच्या 'The Tourist Movement' या पुस्तकात पर्यटकाची व्याख्या दिली आहे. त्यांच्या मते, 'जी व्यक्ती स्वत:चे घर सोडून एक वर्षापेक्षा कमी

† आजीव सदस्य क्रमांक : १६०९, भ्रमणध्वनी : ९९२३९४८३८९, ई-मेल - mknannaware9@gmail.com

कालावधीसाठी आर्थिक प्राप्ती न करता मनोरंजनासाठी बाहेर पडते तिला पर्यटक म्हणतात.' एखादी व्यक्ती आपला देश सोडून इतर देशांमध्ये कमीत कमी २४ तासासाठी जाते तिला पर्यटक असे म्हणतात. हे पर्यटक ज्या ठिकाणाला भेट देतात त्या ठिकाणाला सर्वसामान्यपणे पर्यटन स्थळ म्हणतात. महाराष्ट्रातील पर्यटनकाळ सप्टेंबर ते मार्च आहे.

### पर्यटनाचे महत्त्व

पर्यटनाचे महत्त्व आपणास खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) पर्यटन हे आपल्या आयुष्यात आनंद आणि अविस्मरणीय क्षण निर्माण करतेच पण सोबतच कोणत्याही देशासाठी हे सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक आणि आर्थिक विकासातही महत्वाची भूमिका बजावते.

२) या क्षेत्रात वर्ग एक ते वर्ग चारपर्यंत रोजगाराची संधी आहे. या क्षेत्रात १० लाखाची गुंतवणूक केल्यास ८९ रोजगार निर्माण होतात. इतर उद्योगात मात्र हे प्रमाण केवळ १३% एवढे आहे. त्यामुळेच जगातील अनेक देशांनी पर्यटनाला प्राधान्य दिले आहे. दुबई, मलेशिया, सिंगापूर व श्रीलंकेसारख्या लहान लहान देशांनी पर्यटनाच्या बळावर बरीच प्रगती केली आहे. पर्यटन उद्योगातून येणाऱ्या मिळकतीचे देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान आहे.

३) पर्यटन स्थळ हे एक व्यवसायाचे व आर्थिक उत्पन्न मिळवून देणारे महत्वाचे साधन आहे त्यामुळे पर्यटन उद्योग वाढत आहे.

४) पर्यटन स्थळांमुळे परकीय पर्यटकांना आकर्षित करून विदेशी चलन मिळविता येते. देशाची व राज्याची अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने परकीय चलनास अधिक महत्त्व आहे. पर्यटनामुळे भारतात दरवर्षी सरासरी ३३०० कोटी परकीय चलन मिळते व दरवर्षी सरासरी १४ कोटी विदेशी पर्यटक भारताला भेटी देतात.

५) पर्यटनामुळे विविध व्यवसायांना प्रोत्साहन मिळते उदा. हॉटेल्स, स्टॉल्स, परिवहन, स्थानिक उद्योग, कला उद्योग इ. पर्यटन स्थळांमुळे रोजगाराच्या संधी वाढतात. आज देशाच्या एकूण श्रमशक्तीच्या २.४% म्हणजेच ७८ लाख लोक हॉटेल व्यवसायात कार्यरत आहेत. तसेच ग्रामीण कास्तकार, गालिचे विणकर, भेटवस्तू विक्रेते व पर्यटन संस्थामध्ये कार्यरत लोकांची संख्या मोठी आहे.

६) प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या पर्यटन उद्योगात २ कोटी लोक गुंतले असून हॉटेल, विमानसेवा, प्रवासी संस्थांमध्ये महिलांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त आहे. पर्यटन स्थळ असल्यामुळे त्या परिसरातील स्थानिक लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे राहणीमान उंचावण्यास मदत होते.

### विदर्भाचा इतिहास व पर्यटन

विदर्भ महाराष्ट्रातील एक महत्वाचा प्रदेश आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० साली झाली. त्यावेळी विदर्भ महाराष्ट्रात सामील झाला. १९६० पासून तर आजपावेतो विदर्भ प्रदेश हा अजूनही मागास राहिलेला आहे. परंतु येथील उद्योगांमुळे विदर्भ आपली विशेष ओळख निर्माण करत आहे. या प्रदेशामध्ये ज्वारी, गहू, कापूस, सोयाबीन व संत्र्याच्या बागा फार मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे नागपूर शहर हे आंतरराष्ट्रीय स्तरावर 'Orange City' म्हणून प्रसिध्द पावले आहे.

विदर्भात मुबलक वनसंपदा आणि निसर्गरम्य ठिकाणे आहेत. येथील वनराई, ऐतिहासिक किल्ले, धार्मिक स्थळे आणि व्याघ्रप्रकल्प पर्यटकांना खुणावत आहे. पर्यटन स्थळे देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करीत असल्याने विदर्भ पर्यटनाचे 'डिस्टिनेशन' बनले आहे. विदर्भाचे प्रसिध्द वैशिष्ट्य म्हणजे भंडाऱ्याची ऑर्डीनन्स फॅक्टरी, कोराडी येथील ऊर्जा निर्मिती केंद्र, वरोऱ्यामधील

आनंदवन, गडचिरोलीतील विस्तीर्ण घनदाट जंगल, नागपूर मधील दिक्षाभूमी, वर्धा येथील सेवाग्राम आश्रम, पवनार येथील आचार्य विनोबा भावे यांचा आश्रम, बोरधरण, चिखलदारा, नागझिरा, शेगांव, नवेगांवबांध, पेंच प्रकल्प, रामटेक तसेच जगात अद्भूत आश्चर्य गणले गेलेले लोणार सरोवरही याच भूमीत आहे. इत्यादी अनेक नावे आणि पर्यटनाचा उल्लेख विदर्भाच्या संदर्भात करता येईल. आद्यकवी मुकुंदराज असो की महाकवी कालिदास असो की अलीकडचे संत गाडगेबाबा, मोझरीचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या सर्वांची कर्मभूमी विदर्भ आहे. विदर्भ हा आदिवासींचे मूलस्थान आहे. उदा. भिल्ल, कोरकू, गोंड या आदिवासी जमाती. १९ व्या शतकात सुरूवातीला गोंडानी भोसल्यांच्या राजवटीमध्ये राजसत्ता उपभोगली आणि त्यानंतर ते नागपूर शहराचे राज्यकर्ते बनले. १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये विदर्भातील वर्ध्याचे प्रमुख उद्योगपती जमनालाल बजाज यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यानंतर आचार्य विनोबा भावे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भक्तीच्या माध्यमातून लोकांना स्वातंत्र्य चळवळीमध्ये योगदान देण्यास प्रोत्साहित केले.

विदर्भ पर्यटन स्थळांनी व निसर्ग सौंदर्यांनी नटलेला प्रदेश आहे. याचा उपयोग आपल्या उत्पन्नवाढीसाठी करता येईल. आज संपूर्ण जगात पर्यटन उद्योग फार झपाट्याने विकसित होत आहे. विदर्भातील एकूण ११ जिल्ह्यांपैकी यवतमाळ, गोंदिया, गडचिरोली व वाशिम या चार जिल्ह्यात फारशी पर्यटन स्थळे नाहीत. पण उर्वरित जिल्ह्यात पर्यटन व्यवसायाला अधिक वाव आहे. म्हणजेच संपूर्ण विदर्भास पर्यटन एक उद्योग म्हणून विकसित करण्यासाठी फार मोठी संधी उपलब्ध आहे.

## विदर्भातील पर्यटकांची संख्या व महसूल

१९९९ मध्ये महाराष्ट्र शासनाने पर्यटनाला उद्योगाचा दर्जा दिल्यामुळे गुंतवणुकदारांना पर्यटनात गुंतवणूक करण्याची संधी मिळाली आहे. केंद्र सरकारच्या मेगा सर्किट कार्यक्रमांतर्गत विदर्भात निसर्ग पर्यटनासाठी जवळपास ५० कोटीची गुंतवणूक केली जाणार आहे. विदर्भ इकॉनॉमिक डेव्हलपमेन्ट कौन्सिल- ऑक्टोबर २०१६ (पी. डी. एफ.) च्या उपलब्ध आकडेवारीनुसार विदर्भातील ताडोबा, नागझिरा, पेंच, मेळघाट व नवेगांव बांध या पर्यटन स्थळांपासून पर्यटकांची संख्या अनुक्रमे १ लाख, ४०,०००, ५०,०००, ४०,००० व ४०,००० आहे, तर प्रति वाहनाचा खर्च हा अनुक्रमे २०००, ३००, ५००, ५०० व ३०० एवढा आहे. तर यापासून मिळणारे उत्पन्न अनुक्रमे ५० लाख ते १ कोटी, ३० ते ३५ लाख, ६२ ते ७० लाख, ६२ ते ६५ लाख व २६ ते ३० लाख रूपये प्राप्त होते. एकट्या ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पापासून गेल्या सात वर्षातील फेब्रुवारी २०१६ पर्यंत पर्यटकांची संख्या, वाहनांच्या संख्येत व उत्पन्नात वाढ झाली आहे. तेथे अनुक्रमे एकूण ६ लाख ४० हजार २८६ पर्यटकांनी भेटी दिल्या असून वाहनांची संख्या एकूण १ लाख १० हजार ९५८ इतकी झाली तर २०१५-१६ या वर्षात मिळालेले उत्पन्न ४ कोटी २५ लाख रूपये इतके आहे. तर गेल्या सात वर्षातील १२ कोटी ८२ लाख ६६ हजार रूपये उत्पन्न या प्रकल्पाला प्राप्त झाले आहे. पर्यटनाच्या माध्यमातून विक्रमी उत्पन्न होणाऱ्या देशातील पहिल्या पाच व्याघ्र प्रकल्पांत ताडोबाचा समावेश आहे.

तरीही पर्यटनस्थळावर होणाऱ्या जिल्हानिहाय खर्चाचे तुलनात्मक विश्लेषण केल्यास विदर्भात पर्यटनाकडे पुरेसे लक्ष दिले जात नसून या खर्चाच्या तुलनेने इतर जिल्हे पर्यटनाच्या बाबतीत उदासीन दिसून येतात. कोणत्याही विभागाच्या अर्थव्यवस्थेला उभारणी देण्याची क्षमता पर्यटन व्यवसायात आहे. मात्र त्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्यासह पर्यटन स्थळाच्या 'मार्केटींग'वर भर देण्यची गरज आहे.

## सूचना व शिफारशी

महाराष्ट्र शासनाने व केंद्र शासनाने विदर्भातील पर्यटन व्यवसाय विकसित करण्यासाठी अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. विदर्भाच्या विकासाकरिता काही सुचना पुढीलप्रमाणे -

१) पर्यटन स्थळ असलेल्या शहरांचे व्यवस्थापन चांगल्यारितीने करता येईल अशी सक्षम यंत्रणा व भक्कम आर्थिक तरतूद शासनाने केली पाहिजे.

२) पर्यटन विकास आराखड्याला गती देणे, आवश्यक मनुष्यबळासाठी अभ्यासक्रम निर्माण करणे, अभयारण्यात येणाऱ्या पर्यटकांसाठी वाहन व गाईडची निर्मिती करणे, कृषी पर्यटन वाढीसाठी ग्रामीण भागातील नागरिकांना प्रशिक्षण शासनाने द्यावे.

३) राज्यशासन व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने येथील पर्यटन स्थळांचा विकास केला तर विदेशी चलन गंगाजळीत वाढ होणार.

४) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची पर्यटन विकासासाठीची आर्थिक तरतूद फारच तुटपुंजी असते. यामधील बराच मोठा खर्च कर्मचारी वर्ग व इतर सोयी सवलतींवर होतो. या संदर्भात महामंडळाचे माजी अध्यक्ष श्री. उत्तमराव राठोड एका परिसंवादात म्हणाले होते, पर्यटन संस्था, विश्वस्त मंडळ यांनी पुढे येऊन पर्यटन स्थळांचा विकास करावा व शासनावर अवलंबून राहू नये. असे असले तरी शासनाने याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही कारण पर्यटनाबरोबरच विदर्भाचाही विकास होईल.

५) पर्यटन संचालनालयाने विदर्भातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. पर्यटन केवळ उत्पन्न मिळवून देणारे साधन नसून त्यापासून देशी व परदेशी पर्यटकांना माहिती मिळते व राज्याच्या पारंपारिक ठेव्याचे महत्त्व मिळते.

६) पर्यटन विभागाच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यंत्रणेस पर्यटन तंत्रे आणि व्यवसायिकतेचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. अशी व्यावसायिक दृष्टी यंत्रणेकडे नसल्यामुळे हा अनमोल पारंपारिक ठेवा पर्यटकांपासून दुरावत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

७) राजस्थान राज्य पर्यटन आणि कर्नाटक राज्य पर्यटन विकास महामंडळाची कार्यपध्दती देशात सर्वात चांगली समजली जाते. त्या धर्तीवरच महाराष्ट्र पर्यटन मंडळ आणि पर्यटन स्थळ शहरांची कार्यपध्दती अधिक पर्यटकांभिमुख आणि व्यावसायिक होणे गरजेचे आहे.

८) राज्याच्या पर्यटन खात्याने विविध राज्यांत व भागांत जाऊन आपल्या राज्यातील पर्यटनस्थळे व पर्यटकांसाठी असलेल्या विविध योजना यांची सविस्तर माहिती देणे आवश्यक आहे. तसेच राज्यातील संपूर्ण पर्यटन स्थळांची विस्तृत माहीती असणारी पुस्तिका तयार करणे आवश्यक आहे.

पर्यटन स्थळ विकासाच्या संदर्भात केलेल्या उपरोक्त सुचना अंतिम उपाय ठरणार नाहीत. परतु काही प्रमाणात का होईना त्यांचा उपयोग विदर्भातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी निश्चितच होईल. विदर्भातील इको टुरिझम या निसर्ग पर्यटनाला चालना देण्यात येईल.

## समारोप

पर्यटन क्षेत्र हे दारिद्र्य निर्मूलनाचे एक प्रभावी माध्यम आहे. तसेच ते गरिबांच्या वस्तू सेवा संबंधात बाजार पोहोचत नसल्याच्या शक्यतेचे उपभोक्त्यांना गरिबांच्या दारापर्यंत घेऊन जाऊन उपशमन करते. हे क्षेत्र मध्यस्थांची असणारी आवश्यकता कमी करते आणि वसुलीमध्ये सुधारणा घडवून आणते. परंतु या शक्यतेचा पूर्ण उपयोग हा तेव्हाच घेतला जाऊ शकतो

की, जेव्हा मागणी आणि पुरवठा या दोघांमधील अडथळ्यांना दूर करून भारतीय पर्यटन क्षेत्राच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकतेमध्ये सुधारणा घडवून आणली जाते. यासाठी सरकारने सकारात्मक दृष्टिकोण स्वीकारला जाण्याची आवश्यकता आहे. कारण गरिब आणि वंचित वर्ग पर्यटन कंपन्याबरोबर वाटाघाटी करण्यास सक्षम असत नाही त्यामुळे प्राधिकाऱ्यांनी गरीब व उपेक्षित कार्याच्या बाजूने आपले मत मांडून त्यांच्या हिताचा विचार केला पाहीजे.

### संदर्भसूची


१. दै. लोकमत - २७ सप्टेबर २०१५, २९ ऑगस्ट, २०१६
२. दैनिक लोकसत्ता, १२ एप्रिल २०१६
३. दै. सकाळ - १६ जानेवारी २०१७
४. माझा विदर्भ - २७ सप्टेंबर, २०१६
५. योजना मासिक (मराठी), जानेवारी २००६, पान क्र. ६७,६८
६. योजना मासिक (मराठी), मे २००६ पान क्र. ३७
७. योजना मासिक (मराठी), मे २०१५ पान क्र. ४,१०,१९
८. VED Council, 10 Oct. 2016 (जनमंच)
९. https://mr.wikipedia.org/s


---

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## व
## 'जयहिंद शैक्षणिक धुळे'चे झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे
## यांच्या संयुक्त विद्यमाने
## 'धुळे व्याख्यानमाला' (२०१६-१७)

दि. १७ जानेवारी, २०१७ रोजी झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुळे येथे धुळे व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. सदर व्याख्यानमालेत मा. श्री. श्रीराम देशपांडे (सनदी लेखापाल, पी.डी. दलाल अँड कंपनी, धुळे) यांचे 'भारताचे विमुद्रीकरण २०१६' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

भारतातील विमुद्रीकरणाचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम याबाबत मा. श्रीराम देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास अर्थसंवादचे प्रमुख संपादक डॉ. अविनाश निकम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एच. पवार, उपप्राचार्य डॉ. विद्या पाटील, धुळे शहर व परिसरातील विविध महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. पी.एच. पवार यांनी भूषविले. प्रास्ताविक प्रा. ए. वाय. बच्छाव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संगीता लोहालेकर यांनी केले.

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

Issue-20, Vol-16, Oct. to Dec.2017
International Multilingual Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

UGC Approved Jr.No.62759

Oct. To Dec. 2017
Issue-20, Vol-16

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

30

# बँकाची बुडीत कर्जे : एक चिंतनीय बाब

प्रा. एम. के. नन्नावरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, अकोट

***********

**प्रस्तावणा :-**

अर्थव्यवस्थेचा गाभा म्हणजे बँकिंग क्षेत्र या क्षेत्राची शक्ती व उत्साह देशाचे चांगले आरोग्य व भरभराट निर्देशित करते. आजच्या शिथिलीकरणाच्या अर्थव्यवस्थेत बँकिंग व आर्थिक क्षेत्रीय सुधारणा यांना अग्रक्रम मिळणे स्वाभाविकच आहे. नविन आर्थिक सुधारणा कार्यक्रमाने बँकिंग क्षेत्रावर, विशेषतः खाजगी बँकिंग क्षेत्रावर जास्त जोर दिला आहे. बँकेचे मुख्य कार्य भांडवल उभारणे व यातून कर्ज वितरण करणे हे आहे. बँकेकडून जे कर्ज दिले जाते तो पैसा सामान्य माणसाचा (जमाकर्त्यांचा) असतो आणि तो सुरक्षित ठेवण्यासाठी बँकांना विश्वस्त म्हणून काम करावे लागते. बुडित कर्जाचा प्रश्न खाजगी क्षेत्रातील किंवा विदेशी क्षेत्रातील बँकापेक्षा सार्वजनिक बँकाबाबत मोठ्या प्रमाणात आहे बुडित कर्जाचा बँकेच्या नफ्यावर खेळत्या पैशावर व लाभांवर थेट परिणाम होत असतो. आंतरराष्ट्रीय मानकाच्या तुलनेत भारतीय सार्वजनिक बँकाशी बुडित कर्जे मोठ्या प्रमाणात आहेत. बँकिंग उद्योगात आज सर्वात मोठे आव्हान बुडित कर्जाचे प्रमाण कमी करण्यासाठी व्यवस्थापन करणे हे आहे.

**बुडीत कर्जाची संकल्पना :-**

बँकेपुढील महत्वाचे कार्य म्हणजे कोणती कर्जे बुडित आहेत किंवा कोणती वसूल होण्यासारखी आहेत हे ठरविणे. बँकांनी किंवा वित्तीय संस्थांनी जी कर्जे दिलेली आहेत त्या कर्जाबाबत कर्ज घेणारा, व्याज उशिरा देत असेल किंवा देतच नसेल, कर्जाच्या परतफेडीचा हप्ता देत नसेल किंवा उशिराने देत असेल तर अशा कर्जाला बुडित कर्ज असे म्हणता येते. ज्या मालमत्तेमधून बँकेला उत्पन्न मिळण्याचे थांबते याला Non - Perferming Assest - NPA काळ न करणारी मत्ता म्हटले जाते. दिलेल्या कर्जाबाबत बुडित कर्ज म जाते. बुडित कर्ज म्हणजे असे कर्ज ज्यात व्याज, किंवा मुद्दल ि दोन्ही १८० दिवसांपर्यंत बँकेला दिले जात नाही. मार्च २००४ प ९० दिवसात व्याज किंवा बँकेने ठरवून दिलेली रक्कम बँकेला मि नाही तर हे कर्ज बुडित कर्ज म्हणून धरायचे असते.

एम. नरसिंहम समितीच्या शिफारशी प्रमाणे RBI ने ३ NPA ची नवी व्याख्या केली आहे आणि खालील चार प्रका बँकांनी आपली ॲसेट दाखवावी असे आदेश दिले आहेत.

**१) प्रमाणित मत्ता / चांगल्या दर्जाची मत्ता (Stadard Assets**

याला NPA म्हटले जात नाही कारण यामध्ये कोणत प्रश्न निर्माण होत नाही किंवा यामुळे कर्ज देण्यातला धोका (cre risk) निर्माण झालेला नसतो सर्व कर्जामध्ये काही लबाडी (frau आहे असे वाटले तर त्यासाठी तरतूद करावी लागते.

**२) कमी दर्जाची मत्ता (Sub-Standard Assets) :-**

२ वर्षांपेक्षा जास्त थकबाकी नसलेली जी कर्जे असत त्यांना कमी दर्जाची कर्जे म्हणतात बाकी कर्जांच्या १०% रक्कम व चालू वर्षातील देणे झालेले व्याज व पूर्वीच्या वर्षातले राहिलेले व्या इतकी तरतूद करावी लागेल.

**३) शंकास्पदमत्ता (Doutful Assest) :-**

२ वर्षांपेक्षा जास्त काळ NPA दाखवलेली ॲसेट त्यापैक जो भाग पूर्णपणे असुरक्षित आहे त्याच्या २० ते ५० % तरतु आवश्यक असते. ही टक्केवारी काळाप्रमाणे बदलून ५० पर्यन्त जाईल पुढारलेल्या देशाच्या ५% च्या तुलनेत हा आकडा खूप जास्त आहे. NP मधून बँकांना उत्पन्न दाखवता येत नाही त्यासाठी त्यांना तरतूद करायची असते

**४) पूर्ण बुडित मत्ता :-**

ज्या कर्जाला बँक ऑडिटर व रिझर्व्ह बँक इन्स्पेक्टरांचं बुडित दाखवलेले आहे त्यातील दिलेली सिक्युरिटीसुद्धा वसूल होत नसेल तर अशा मत्तेची पूर्णपणे तरतूद केली पाहीजे. चांगल्या दर्जाच्या मत्तेला Performing Assets असे म्हणतात व बाकीच्या मत्ता Non - Performing Assets होय.

**बँकाची वाढती थकीत कर्जे :-**

कर्जवसुली आणि खास करून कॉर्पोरेट कर्जाची व उर्जा पायाभूत सुविधा, बांधकाम क्षेत्रातील कर्जाची वसुली न झाल्यामुळे थकीत कर्जाचे प्रमाण सतत वाढू लागले आहे. मार्च २००१४ मध्ये ढोबळ थकीत (ग्रास एन.पी.ए.) चे प्रमाण ४% होते ते मार्च २०१ मध्ये ७.६% झाले त्यात वाढ होऊन मार्च २०१७ मध्ये ९.५% ए झाले आहे. मार्च २०१७ अखेर सार्वजनिक क्षेत्रातील बँकानी ढो अनुत्पादित मालमत्ता ६.४१ लाख कोटी रूपये झाली असून वर्षभ

ती ५.०२ लाख कोटी रूपये एवढी होती. तर RBI चा आर्थिक स्थेयं अहवाल (Financial Stability Report) नुसार मार्च २०१८ पर्यन्त ९.९% ते १०.३% च्या घरात जाण्याचे कयास आहेत.

२०१५ - १६ मध्ये RBI चे तत्कालीन गव्हर्नर रघुराम राजन यांनी बँकांच्या तपासणी अंतर्गत एका वर्षांत बँकांच्या थकीत कर्जांची रक्कम १५०% नी वाढून ३,२३,२१६ कोटी रूपयांवर गेली. यामुळे मार्च २०१६ मध्ये नऊ बँका तोट्यात गेल्या. तर मार्च २०१७ मध्ये आठ बँका. मार्च २०१६ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचा नफा होता १,३६,२७५ कोटी रूपये, पण थकित कर्जांपर्यन्त केलेल्या तरतुदीमुळे निव्वळ तोटा १८,४१७ कोटी रूपयांवर गेला. मार्च २०१७ मध्ये नफा १,५८,९८२ कोटी रूपये होता; तर निव्वळ तोटा ११,३८८ कोटी रूपये एवढा झाला. काही बँकातून तर थकीत कर्जांचे प्रमाण २५% पर्यन्त जाऊन पोहोचले आहे. थकीत कर्जे व तणावाखाली असलेली म्हणजे संभाव्य थकीत कर्जे एकत्रित केली तर तो आकडा १० लाख कोटी रूपयांचा टप्पा ओलांडतो म्हणजेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या थकीत कर्जांची २५% हा टप्पा ओलांडला आहे.

नुकताच प्रसिद्ध RBI चा वित्तीय स्थैर्य अहवालानुसार एकूण कर्ज रकमेतील ५५% कर्जे ही बँकांनी मोठ्या उद्योगांना वाटली आहेत. यापैकी ८६% कर्जे थकीत आहेत, रिझर्व्ह बँकेनेच १२ मोठी थकीत कर्जे निश्चित केली आहेत जी बँकांनी नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलकडे संदर्भित केली आहेत ज्यात थकीत आहे २,५३,७२९ कोटी रूपये एवढे, यातून हे स्पष्टच होते की, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांतून थकीत कर्जांचा प्रश्न उभा आहे तो मोठ्या उद्योगांकडील थकीत कर्जांमुळे याचाच अर्थ सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील पेचप्रसंगावर मात करायची झाली तर मार्ग शोधून काढायला हवा तो थकीत कर्जांच्या वसुलीचा.

**राइट ऑफ :-**

RBI च्या मार्गदर्शक तत्वानुसार थकीत कर्जाचा वाढता आकडा आटोक्यात आणण्यासाठी बँकांनी एक सोपा मार्ग शोधला तो घराइट ऑफड म्हणजेच खातेपुस्तिकेतून ती थकीत कर्जे त्यासाठी तरतुद करून दूर करण्याची. म्हणजेच सुरूवातीला ताळेबंद व्यवस्थापनाचा एक भाग म्हणून त्या हेतूपुरती माफ करण्याचा. या सदराखाली बँकानी गेल्या पाच वर्षांत २,४९,९२७ कोटींचा थकीत कर्जे राइट ऑफ म्हणजे माफ केली आहेत. आजच्या थकीत कर्जांचा आकडाही राइट ऑफ केलेली थकीत कर्जे वगळता आहे. याशिवाय बँकांना उपलब्ध मार्ग आहे वसुली प्राधिकरणात दावा दाखल करण्याचा.

**बँकांची बुडीत कर्जे वाढण्याची कारणे :-**

बँकांची बुडीत / थकित कर्जांच्या वाढत्या बोजाबद्दल विचार करतांना बुडीत कर्जे वाढण्याची कारणे कोणती याचा विचार प्रथम केला पाहिजे अनेक एजन्सींनी या बाबत अभ्यास केला आहे. प्रत्येका बुडित कर्जे वाढण्याची वेगवेगळी कारणे दिली आहेत त्यातील काह कारणे पुढील प्रमाणे

* कर्ज घेणारा घेतलेल्या कर्जांचा उपयोग बँकेला दिलेल्य कारणापेक्षा इतर कारणांसाठी करतो.
* सरकारने पुरस्कृत केलेल्या योजनांना अग्रक्रम क्षेत्र कर्ज देते
* दिलेल्या निधीचा वापर योग्य कारणासाठी होतो आहे कं नाही याबद्दलचे संनियंत्रण (monitoning) प्रभावी नसते.
* कर्ज घेतलेल्या ऋणनोंदी संख्या मोठी असल्याने अनुवर्त काम होत नाही.
* कर्जांची रक्कम वसूल करण्याच्या पद्धतीत कायद्याची मोठी गुंतागुंत असते.
* पुरेशी प्रतिहमी, प्रतिभूमी (Security) घेतलेली नसते.
* कर्जे देण्याआधी मालमत्तेचे केलेले मूल्यन बरोबर नसते.

याशिवाय ऋणकोच्या बाजूने बरीच कारणे देता येतील त्यामुळे कर्जे बुडीत होतात.

* तंत्रज्ञान विषयक बदल
* बाह्य स्पर्धा
* वीज पुरवठा कमी होणे, खंडित होणे
* धंद्यामध्ये नुकसान येणे
* अकार्यक्षम व्यवस्थापन
* मालक - मजूर संबंध बिघडणे
* मालाच्या किंमती एकदम वाढणे
* उत्पादन प्रचालनात काही अंगभूत समस्या असणे.

या व्यतिरिक्त काही ऋणको मुद्दाम चांगली परिस्थिती असतांना कर्ज फेड करीत नाहीत.

**बँकांच्या बुडीत कर्जाबाबत उपाययोजना :-**

बँकांच्या बुडीत कर्जाबाबत १९९८ मध्ये एम. नरसिंहम समितीच्या अहवालात बँकाच्या बुडीत कर्जाबाबत तोट्यातल्या बँका बंद करण्यात व फायद्यात असणाऱ्या बँकांचेच एकमेकांत विलीनीकरण करावे, तसेच भारतात तीन पातळीवर बँकींग पातळी असावी अशा शिफारशी करण्यात आल्या होत्या. २००४ मध्ये पी. जे. नायक समितीनेही विलिनीकरणाचा प्रस्ताव सादर केला होता. अशाप्रकारे RBI च्या मार्गदर्शक नियमाप्रमाणे विविध समित्यांनी शिफारशी केल्याप्रमाणे सार्वजनिक बँका अनेक तऱ्हेचे उपाययोजीत आहेत. याचबरोबर ज्याप्रमाणे सर्व बँकांनी एन.पी.ए.ची सरासरी पातळी व कर्ज वसूलीसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करता येईल.

* बँकाकडे उपलब्ध असलेल्या भांडवलाची उपलब्धता

लक्षात घेऊन उद्योजकांनी आपल्या व्यवसायाचा आराखडा निश्चित केला पाहिजे. त्यामुळे घेतलेल्या कर्जाची आराखड्यानुसार परतफेड करणे शक्य होईल.

* कर्जफेड बरोबर होत नसेल तर त्याची वसुली कशी करावी. कुठल्या पद्धतीने करावी याबाबत चर्चा होणे गरजेचे आहे.

* कर्ज फेडीच्या हप्त्यात दिरंगाई अजिबात खपवून घेवू नये अशा तऱ्हेची मानसिकता बँक अधिकाऱ्यांमध्ये निर्माण करणे जरूरीचे आहे.

* जेव्हा कर्जाची रक्कम फार मोठी असते तेव्हा कर्ज प्रस्तावाची छाननी अतिशय काळजीपूर्वक व्हायला हवी कारण एन.पी.ए. मधील फार मोठा भाग अशा मोठ्या कर्जाचाच असतो.

* कर्ज दिलेल्या रकमेचा विनियोग संबंधित कामासाठीच होतो आहे याची तपासणी करणे.

* कर्ज दिल्यानंतर वसुलीसाठी योग्य प्रकारे पाठपुरावा करणे.

* कर्ज वसुलीसाठी मेळावे आयोजित करणे.

* कर्ज / हप्ते न देणाऱ्यांची एकत्रित सभा आयोजित करणे.

बुडीत कर्जाचे (NPA) प्रमाण खुप मोठे राहिले तर त्याचा बँकिंग उद्योगावर विपरित परिणाम होईल त्यासाठी एक घोषणा केलेली आहे. Lend, but lend for a purpose and with a purpose.ड्ढकर्जा द्या जरूर द्या. पण ते योग्य कारणासाठी द्या व योग्य काळजी घेऊन द्याड्ढही घोषणा अंमलात आणली तर बँकिंग उद्योगात बुडीत कर्जाच्या संकटातून बाहेर पडू शकेल.

संदर्भ :-

१) सांबरे अनिल, सांबरे श्रीनिकेत (२०१६) :- कर्जवसुली मार्गदर्शक, नचिकेत, प्रकाशन नागपूर

२) योजना, एप्रील - २०००, नोव्हेंबर - २००४

३) दै. लोकसत्ता - जानेवारी - २०१३, जून - २०१७, ऑगस्ट - २०१७, सप्टेंबर - २०१७, नोव्हेंबर - २०१७

४) दै. नवप्रभा - एप्रील - २०१६

❖❖❖

**31**

# मराठी साहित्यातील स्त्रीमुक्तीविषयक दलित लेखिकांचे योगदान

प्रा.डॉ. रेखा नारायण वाघ
स. प्राध्यापिका राजर्षी शाहू कला, विज्ञान महाविद्यालय,
वाळूज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

***********

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यातील प्रत्येक स्त्रीला दलित साहित्याच्या दृष्टिकोनातून बघितल्यास सुरूवातीपासूनच दलित स्त्रियांची व्यथा–वेदना आणि अहवेलना झालेली आहे. केवळ स्त्रियाचीच नव्हे तर संपूर्ण समाजाची अहवेलना झाली आहे. आणि मुळात दलित चळवळीची सुरूवात व दलितांच्या वेदनेला वाचा फोडण्याचे कार्य आधुनिक काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितोद्धाराच्या कार्यापासून झाली आहे. डॉ. बाबासाहेबांच्या स्त्री संबंधीच्या शिक्षणाविषयक क्रांतीकारी विचारांच्या चळवळीतून प्रेरणा घेऊन आत्मोद्धारासाठी अनेक दलित स्त्रियापुढे आल्या आणि उच्चविद्याविभूषित होऊन माणूस स्वाभिमानाने, निर्भिडपणे जगु लागल्या. जीवनातल्या विविध क्षेत्रात आपली अस्मिता दाखवून त्यांनी आपले अस्तित्व सिद्ध केले. त्याचप्रमाणे अनेक स्त्रिया डॉ. बाबासाहेब पासून प्रेरणा घेऊन साहित्याच्या माध्यमातून समाज प्रबोधनाच्या कार्यातही सहभागी झाल्या आहेत. अर्थात दलित पुरूष लेखकाच्या तुलनेत दलित लेखिका संख्येने अतिशय कमी आहेत. परंतु ही चिंतेची बाब नाही. उलट चिंतनीय अशीच बाब म्हणावी लागेल कारण त्याचे लेखन सामाजिक बांधिलकीतून झाले आहे आणि समाजप्रबोधन हा त्यांच्या लेखनाचा उद्देश आहे.

मराठी साहित्यातील दलित साहित्य हे सत्य व वास्तववादी साहित्य आहे. युगपुरूषांच्या वैचारिक

## II. Books published:-

| Name of the Author | Title of the book | Year | Publisher & ISSN / ISBN No. |
|---|---|---|---|
| **N. A.** | | | |

## III. Paper Presented Conference byFaculties :-

| Title of Paper | Details of Conference Publication | Name of the author/s | International/ National/ State | Year of publication | ISSN/ ISBN number |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्रातील दुष्काळ,कारणे व उपाय | मराठी अर्थशास्त्र परिषद चांदवड व राष्ट्रीय परिषद | Mr. M.K Nannaware | National Level Conf. | 06 to 08 Nov 2016 | ISSN- 978-93-24457 |
| भारतातील शाश्वत कृषिचा विकास | राष्ट्रीय चर्चासत्र | Mr. M.K Nannaware | National LevelSeminar | 18 -02-2017 | ISBN- 978-93-86013 |
| विदर्भातील नेसर्गिक साधन संपत्तीचे अर्थशात्र | विभागीय परिषद | Mr. M.K Nannaware | ReginalLevel Conf. | 05-03-2017 | ISSN- 2319-6289 |
| Relevance of GandhisIdeal of Sel-Sufficient Village Economy | State Seminar | Mr. M.K Nannaware | State Level Seminar | 27-03-2017 | ISBN- 978-93-82962 |
| विदर्भातील मानव विकासाच्या निर्धारक घटकांचे अध्ययन | राष्ट्रीय चर्चासत्र | Mr. M.K Nannaware | National LevelSeminar | 19-08-2017 | ISBN- 978-81-921694 |
| नोट बंदीचा पीक कर्ज वाटपावर (रब्बी हंगाम) झालेला परिणाम-विशेष संदर्भ-विदर्भ | राष्ट्रीय चर्चासत्र | Mr. M.K Nannaware | National LevelSeminar | 24-2-2018 | ISSN- 2319-9318 |

श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम संचलित,

कर्मवीर केशवलालजी हरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतीलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य व श्रीमान पी.एच. जैन विज्ञान महाविद्यालय,

नेमिनगर, चांदवड

ता. चांदवड-४२३१०१, जि. नाशिक. (महाराष्ट्र)

नॅक पुर्नःमूल्यांकित बी दर्जा प्राप्त

SNJB

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार २०१५-१६ (ग्रामीण)

# मराठी अर्थशास्त्र परिषद

४० वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन

दि. ०६, ०७ व ०८ नोव्हेंबर २०१६

## प्रमाणपत्र

प्रा./डॉ. मोरेश्वर के. नन्नावरे

श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट

दि. ०६, ०७ व ०८ नोव्हेंबर २०१६ रोजी कर्मवीर के.ह. आबड कला, श्रीमान मो.गि. लोढा वाणिज्य व श्रीमान पी.एच. जैन विज्ञान महाविद्यालय, चांदवड द्वारा आयोजित मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४० व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनास प्रतिनिधी म्हणून सहभागी झाल्याबद्दल आणि

" महाराष्ट्रातील दुष्काळ: कारणे व उपाय."

हा शोधनिबंध सादर केल्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

प्रा. सी.आर. गोखले
कार्याध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद

डॉ. एस.एम. भोसले
अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद

प्राचार्य डॉ. जी.एच. जैन
स्थानिक कार्याध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद

डॉ. आर.बी. भांडवलकर
कार्यवाह मराठी अर्थशास्त्र परिषद

डॉ.एस.एस. पाटील
स्थानिक कार्यवाह मराठी अर्थशास्त्र परिषद

ISBN : 978-93-24457-02-2

# अर्थनेमि

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे राष्ट्रीय अधिवेशन




आयोजक:

श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम संचलित, कर्मवीर केशवलालजी हरकचंदजी आबड कला,
श्रीमान मोतीलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य
व श्रीमान पी.एच. जैन विज्ञान महाविद्यालय, नेमिनगर, चांदवड
ता. चांदवड, जि. नाशिक – ४२३१०१.

SNJB

# महाराष्ट्रातील दुष्काळ : कारणे व उपाय

**प्रा. मोरेश्वर के. नन्नावरे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, अकोट
ई-मेल - mknannaware9@gmail.com
आजीव सदस्य क्रमांक - १६०९
भ्रमणध्वनी क्र :- ९९२३९४८३८९

**सारांश :**

जगाच्या अर्थव्यस्थेमध्ये खनिज तेलाच्या साठ्याला जे स्थान आहे ते स्थान उद्या पाणी घेणार आहे पाण्याचा साठा हा २१ व्या शतकात राष्ट्राच्या अस्तित्वाचा प्रश्न बनणार आहे. काही राज्यामध्ये पाण्याच्या तुटवड्यामुळे सतत दुष्काळ पडतो. भुगर्भातील पाण्याची पातळी खोल गेली आहे अपुरा पाऊस होऊन भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे कृषीबरोबरच, पिण्याचा - पाणी पुरवठा, जनावरांना चारा, वृक्षतोड, लोकांना रोजगार, वन्यप्राणी व पक्षी यांना वाचविणे यासारखे प्रश्न निर्माण झाले आहेत. निसर्गाकडून मिळालेल्या पाणी या विनामुल्य ठेवाचा प्रत्येक मानव जातीला राष्ट्राच्या विकासाला उपयोगी कसे पडेल याचा विचार करावा लागेल. कारण आज राष्ट्रीय जीवनात पाण्याची टंचाई ही बाब मोठा व्यत्यय आणणारा घटक व चिंतेची बाब आहे. शासकीय पॅकेजने दुष्काळाचा सामना करण्यासाठी तात्पुरती मदत व दिलासा असते. या दुष्काळ निवारणासाठी अन्नधान्याच्या वितरणावर नियंत्रण, काळाबाजार करणा-यावर अंकुश तसेच मानवाचे प्रमाणिक प्रयत्न व लोकसहभाग हाच एकमेव पॅकेज आहे.मृदसंधारण, जलसंधारण, नैसर्गिक जैवविविधता टिकवून ठेवल्यासारखे कार्य निसर्गासाठी नसून मानवतेसाठीच वरदान असल्याचे माणूस समजून घेईल, तेव्हा ख-या अर्थाने दुष्काळ निवारण झाल्याशिवाय राहणार नाही.

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यपूर्व आणि ब्रिटीशांच्या सत्ता काळामध्ये लहान मोठे मिळून २५ पेक्षा अधिक दुष्काळ पडले होते. १७७० च्या बंगालच्या दुष्काळात प्राण गमाव-यांची संख्या ३५ ते ४० लाख होती. १९२६ ते १९५० चा काळ हा भारतातील सुबत्तेचा होता. एकूण त्या कालावधीतील २५ वर्षात दोनच दुष्काळी वर्षे आहेत. १९७५ ते २००० या काळात एकूण दुष्काळी वर्षाची संख्या (एकूण ९ वर्षे) वाढल्याचे उपलब्ध नोंदीवरून कळते. महाराष्ट्रात १९६२ आणि त्यानंतर सर्वांच्या आठवणीत राहणारा १९७२ चा दुष्काळ. या दुष्काळातील महाराष्ट्रात १००% क्षेत्र अवर्षण पिडीत झाले होते. २०१२-१३ चा पाऊस

सरासरीच्या ९२% आहे आणि सर्वात कमी म्हणाजे ४८% जालना जिल्ह्यात झालेला आहे. २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ चा पाऊस सरासरीच्या अनुक्रमे ७३%, ७०.२% व ५९.४% आहे. आपल्या देशाची पावसाची वार्षिक सरासरी ११५० मिलीमीटर असून त्यापैकी ७३% पाऊस १०० दिवसात कोसळून मोकळा होतो हे पाणी साठवण्याची व्यवस्था आपण निर्माण करू शकलो नाही. वितरण विषम आहे. शासकीय पातळीवर हा धोरणाचा दुष्काळ आहे व समाजाची उदासीनता तेवढीच घातक आहे.

**संशोधनाचा उद्देश :**

१) दुष्काळ (अवर्षण) या संकल्पनेचा अभ्यास करणे

२) दुष्काळाचे स्वरूप व कारणांचा शोध घेणे

३) दुष्काळावरील उपाय व निष्कर्षाची मांडणी करणे

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करण्यत आलेला आहे त्यात प्रकाशित, अप्रकाशित पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके व संकेतस्थळे इत्यादींचा आधार घेण्यात आला असून वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**दुष्काळ संकल्पनेचा अर्थ :**

पावसाअभावी शुष्कता निर्माण करणारा मोठा कोरडा काळ म्हणजे दुष्काळ होय. अतिवृष्टी किंवा अनावृष्टी होऊन पाण्याची तसेच अन्नस्रोतांची अनुपलब्धता किंवा तीव्र टंचाई असलेला अनेक महिन्यांचा किंवा वर्षाचा दीर्घ कालखंड म्हणजे दुष्काळ होय. दुष्काळाची अतिवृष्टी व अवर्षण ही दोन कारणे असली तरी यातील अवर्षण हे मुख्य कारण आहे. कारण अवर्षणामुळे भारतात दर वीस वर्षातून एकदा देशव्यापी दुष्काळ तर प्रत्येक चार वर्षांनी देशाच्या कोणत्यान्‌कोणत्या भागामध्ये दुष्काळाची स्थिती उत्पन्न होते. त्यामुळे सध्या अवर्षण म्हटले की, दुष्काळ असे समीकरण तयार झाले आहे. त्यामुळे अवर्षण म्हणजे काय व अवर्षणाचे प्रकार आपणाला पाहणे गरजेचे आहे.

**अवर्षण :**

जेव्हा अपुरे पर्जन्य, वाष्पीभवनाचा अधिक वेग आणि भूजलासहित जलाशय आणि इतर साठवणीच्या पाण्याच्या अतिरिक्त वापरामुळे होणा-या पाण्याच्या कमतरतेचा विस्तारित कालखंड म्हणजे अवर्षण होय.

**अवर्षणाचे प्रकार :**

भारतीय कृषी आयोगाने अवर्षणाचे प्रकार पुढील प्रमाणे सांगितले आहेत.

१. **कृषी अवर्षण :**

कमी पावसामुळे जमिनीतील ओलावा कमी हाऊन पिकांची वाढ खुंटते त्यामुळे अन्नधान्य व पशुचारा यांची टंचाई निर्माण होते याला कृषी अवर्षण असे म्हणतात.

२. **जलीय अवर्षण :**

जर एखाद्या भागामध्ये दीर्घकाळ पाउस पडला नाही तर त्या ठिकाणचे जलस्रोत ( नाले, ओढे, नद्या, उपनद्या, पाझर तलाव, विहिरी इ. ) आटून भूजलाची पातळी खोल जाते, त्यास जलीय अवर्षण असे म्हणतात.

३. **वातावरणीय अवर्षण :**

जर एखाद्या भागामध्ये वार्षिक सरासरी पर्जन्याच्या २५% किंवा त्यापेक्षा कमी पर्जन्य झाले तर त्यास वातावरणीय अवर्षण असे म्हणतात.

४. **परिस्थितीकीय अवर्षण :**

जेव्हा नैसर्गिक परिसंस्थेच्या उत्पादकतेमध्ये घट होते तसेच प्राकृतिक पर्यावरणाची क्षति होते, यास परिस्थितीकीय अवर्षण असे म्हणतात.

**महाराष्ट्रातील दुष्काळाचे स्वरूप :**

राज्यात २०१४ व २०१५ या सलग दोन वर्षामध्ये सरासरीच्या अनुक्रमे ७०.२% व ५९.४% असा अपुरा पाऊस झाला आहे. राज्यातील ३५५ तालुक्यापैकी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील तालुके वगळता) २ तालुक्यात सरासरीपक्षा अधिक, ७५ तालुक्यात सरासरी एवढा, १२३ अवर्षणग्रस्त तालुक्यामध्ये भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यातील उपयुक्त जलसाठ्याचे दि. १५ ऑक्टोबर २०१५ रोजी संबंधित एकूण जलसाठ्याच्या क्षमतेशी प्रमाण २०१४ मध्ये ७२.५% व २०१५ मध्ये ६१.४% होते. यामुळे केवळ कृषीसाठीच नव्हे तर पिण्याचे पाणी पुरविण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांचे स्वरूप पाहताना असे दिसून येते की, प्रामुख्याने पिण्याचे पाणी, जनावरांना चारा, फळबाग वाचविणे, प्रत्येकाला रोजगार देणे, वन्यप्राणी पक्षी यांना वाचविणे हे प्रश्न निर्माण झाले आहेत. ज्या प्रमाणे निसर्गाच्या अचानक अपत्यामुळे मानवी जीवन विस्कळीत होते. उदा. महापूर, पाऊस न पडणे, रोगराई, भुकंप, ज्वालामुखी यासारख्या गोष्टींमुळे मानवी जिवनाला तडा जातो. तसेच मानवनिर्मित दुष्काळ म्हणून लोकसंख्येतील वाढीमुळे जागेचा प्रश्न, उदर निर्वाहाचा प्रश्न, गलीच्छ वस्तीमुळे रोगराईचा प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. अशा एका कारणामुळे मानवी जीवनाला धोका पोहचत असतो व अशा परिस्थितीवर मात करण्यासाठी त्या ठिकाणापर्यन्त योजना राबविण्यात येत नाही. त्यासाठी सुध्दा अडचणी येत असतात. अशा विविध गोष्टीच्या कारणामुळे दुष्काळाचे स्वरूप लक्षात येत असते. अशा एकूण १२३ तालुक्यांमध्ये पावसाची सरासरी ५०% पेक्षा कमी आहे. यामुळे टंचाईसदृश्य (मराठवाड्यासह) स्थिती जाहीर करतांना जिल्हा हा निकष न ठरविता तालुका घटक निकष धरण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील दुष्काळाची कारणे :**

आजपर्यंतच्या दुष्काळाच्या नोंदणीवरून असे लक्षात येते की, दुष्काळाची कारणे जरी नैसर्गिक असली तरीपण काही मानव कृतींमुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होऊ शकते.

**अ. निसर्गनिर्मित कारण :**

याच कारणाला दैवीकारण सुध्दा मानले जाते. पाऊस कमी पडणे किंवा जास्त पडणे, पिकांवर कीड (रोगराई) पडणे, महापूर, भुकंप, ज्वालामुखी होणे ही दुष्काळ पडण्याची नैसर्गिक कारणे आहेत. या गोष्टीमुळे मानवी जीवनाला धोका पोहचतो. पण यामधील अवर्षण हे दुष्काळाचे सर्वात महत्त्वाचे कारण आहे.

**ब. मानवनिर्मित दुष्काळाची कारणे :**

**१. वृक्षतोड :**

महाराष्ट्रात मानवानेच स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केल्यामुळे जमिनीची झीज होणे, वातावरणाचा समतोल बिघडणे त्यातून पाऊस न पडणे यातून कोरडा दुष्काळ पडणे हे एक वृक्षतोड मानव निर्मित दुष्काळाचे कारण मानले जाते. बेसुमार जंगलतोडीमुळे पर्यावरणीय संतुलन बिघडून दुष्काळ आणि पुरासारख्या समस्या निर्माण होतात. शेती, उद्योगधंदे तसेच दैनंदिन उपयोगासाठी वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे वनाखालील प्रमाण कमी होत असून त्याचा परिणाम पर्जन्यावर होत आहे. एकूण क्षेत्राच्या ३३% क्षेत्र वनाखाली असणे आवश्यक आहे. पण सध्या भारताचे वनाखालील क्षेत्र केवळ २१.३३% आहे.

**२. उद्योग धंद्याचे वाढते प्रमाण :**

देशामध्ये मोठ्या उद्योगधंद्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. अशा उद्योगधंद्याना पाण्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. त्यामुळे सध्या उपलब्ध पाण्यापेक्षा जास्त प्रमाणात पाण्याचा वापर होत चालला आहे.

**३. ओझोन पटलाचा अवक्षय :**

क्लोरोफ्ल्युरोकार्बनच्या अतिवापरामुळे तसेच जेट विमानातून बाहेर पडणा-या प्रदूषकामुळे ओझोन पटलाचा अवक्षय होत आहे. यामुळे तपांबरामध्ये सूर्य किरणाव्दारे येणारी अतिनील किरणे तपांबरात प्रवेश करून हवेच्या अभिसरण प्रवाहाला अडथळा निर्माण करतात. त्यामुळे पर्जन्याचे प्रमाण कमी होते.

**४. भूजलसाठ्यात कमी :**

उपलब्ध पाण्यापेक्षा जास्त पाण्याचा जमिनीतून उपसा होत असल्यामुळे पाण्याची भूजलपातळी

सातत्याने खोल जात आहे. त्यामुळे दुष्काळजन्य परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. अमेरिकेतील नॅशनल एरॉनॉटिक्स अॅण्ड स्पेस एजन्सीने (नासा) प्रसिध्द केलेल्या माहितीनुसार हरियाणा, पंजाब,दिल्ली, आणि राजस्थान या भागातील भूजलपातळी प्रत्येक वर्षी चार सेंटीमीटरने घटत आहे.

**५. दीर्घकालीन धोरणांचा अभाव :**

दुष्काळ निवारणासाठी विविध धोरणे आखली जातात व त्यावर मोठ्या प्रमाणात खर्चही केला जातो. पण यातील बहुतांश धोरणे तात्पुरत्या स्वरूपाची असतात. त्यामध्ये दीर्घकालीन परिस्थितीचा सामना करण्याची क्षमता नसते. उदा. पाण्यासाठी टँकरची सोय. जरी दुष्काळ निवारणासाठी दीर्घकालीन धोरणे तयार केली असली तरी ती पूर्ण करण्यासाठी लागणारा कालावधी अपेक्षित कालावधीपेक्षा कितीतरी मोठा आहे. उदा. नर्मदा प्रकल्प

**६. धान्य साठेबाजी :**

उत्पादन अधिक झाले म्हणजे मालाची निर्यात करणे या बरोबर गोदामात साठा करून ठेवण्याची पध्दत मोठ्या प्रमाणात आढळते. पर्जन्य कमी अधिक झाल्यामुळे दुष्काळजन्य स्थितीत मात्र सर्वसामान्य जनता व शेतकरी यांना कामधंदा नसल्यामुळे उपजीवीका भागविण्यासाठी अन्नधान्य खरेदी करू शकत नाही कारण व्यापारी वर्गाने जर अशा प्रकारची साठेबाजी केलेली असेल तर त्या मालाच्या किंमती जास्त आकारल्यामुळे सर्व सामान्य जनतेला ते घेणे अशक्यप्राय होते व या वस्तुवर अवलंबून असणा-याची संख्या जास्त असल्यामुळे साहजीकच साठेबाजी करणारे या संधीचा फायदा घेउन धान्याचे साठे असूनही जनतेचे अन्नविना मृत्यूमुखी पडणा-यांची संख्या डोळ्यापुढे उभी राहते केवळ नफ्यासाठी व श्रीमंत अधिक श्रीमंत होण्यासाठीच मानवानेच मानवासाठी चालवलेला खेळच म्हणावे लागेल.

**७. शेतकऱ्यांवर व्याजाचा भार :**

महाराष्ट्रात नवीन जमीन धारणा व कर्ज विषयक कायदे यातील तरतूदीमुळे जमीन ही एक विक्रेय वस्तू बनली. महाराष्ट्रातील शेतकरी यांच्यात एक म्हण प्रचलीत झालेली आढळते ती म्हणजे, शेतकरी दिवाळीला शाहणा होतो, कारण शेतक-याला पर्जन्यमानाचा एकून अंदाज नसतो. त्यामुळे असेल त्या परिस्थितीत बी-बीयाणे पेरून देतो. परंतु कमी अधिक पर्जन्यमानामुळे दिपावलीला हंगाम संपल्यावर लक्षात येते की, हे बी पेरले असते तर उत्पन्न चांगले आले असते. परंतू या उत्पन्नासाठी अगोदरच अनुमान काढून इतके उत्पन्न येईलच या आशेने तो सावकाराकडून व्याजाने कर्ज घेतो व प्रत्यक्षात उत्पन्न न आल्यामुळे शेतक-याला त्या सावकाराचे कर्ज फेडता येत नाही. आलेल्या उत्पन्नातून फक्त कर्जाचे तो व्याजच

देतो मुद्दल तसेच राहते. शेतसारा भरावा लागतो शेतक-याला जमिनी गहाण टाकण्याची वेळ येते यात सावकार जमीनदार हेच शेतकऱ्याच्या व्याजावर धनाढ्य बनलेले दिसतात तर शेतकरी व कष्टकरी कामगार कंगाल झालेले दिसतात. या मुळेच कुळे व भुमीहीन शेतमजूर यांची संख्या वाढलेली दिसते. या व्याजाच्या भारामुळेच दारिद्र्य व नैराश्य हेच मानवनिर्मित दुष्काळाचे कारण सांगता येईल.

**उपाययोजना :**

दुष्काळ परिस्थितीवर मात करण्यासाठी विविध गावात अनेक प्रयोग झालेले आहेत. त्यामध्ये राळेगण सिध्दी, हिवरेबाजार, शिरपुर पॅटर्न, मध्यप्रदेश मॉडेल ( सिंचन प्रकल्प ), राजस्थानातील काही गावांच्या यशोगाथा यांचा समावेश आहे. इस्रायल देशातील उपलब्ध पाण्याचे लोकसहभागून नियोजन केले आहे. म्हणून याही दुष्काळावर लोकसहभागातून, सरकार, संस्था, स्थानिक लोक, शाळा यांच्या मदतीने मात करता येईल. तरीही काही उपाययोजना सुचविता येईल.

१. महाराष्टातील अति पर्जन्याचा कोकण भाग सोडला तर राज्यामध्ये सरासरी पर्जन्यमान ३५० ते १००० मिलीमीटर एवढे आहे. यातील जवळजवळ ८५% पाऊस मान्सूनच्या चार महिन्यांत पडत असल्यामुळे आपणाला हे पाणी वर्षभर पुरवण्यासाठी त्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे.

२. वन्य प्राणी, पक्षी यांचे संगोपन करण्यासाठी जसे पक्षासाठी मचिडीयाघरफ (राजस्थान-नगर गावात), लापोदिया गावात- मकबूतरखानाफ, वन्य जिवासाठी मचरागाफ राखीव जागा यासारखे प्रयोग महाराष्ट्रात होणे आवश्यक आहे.

३. सरकारने जनतेच्या सहभागातून विहिर, तलाव, मोठा तलाव, मध्यम प्रकल्प इत्यादी मधील गाळ काढण्याचा धडक कार्यक्रम राबविणे.

४. दुष्काळावर कायमस्वरूपी मात करावयाची असेल तर पाझर तलाव व शेततळे उभारण्यावर अधिक भर देणे आवश्यक आहे.

५. कमी पाण्याच्या पीक पध्दतीचा अवलंब करून शेतक-यामध्ये जनजागृती निर्माण करणे गरजेचे आहे. पावसाचे पाणी अडविणे आणि ज्या ठिकाणी पाणी साठे आहेत तेथुन शेतीच्या बांधापर्यन्त पोहोचण्याच्या योजना सरकारने राबविल्या पाहीजेत.

६. दुष्काळावर मात करण्यासाठी सर्वात प्रभावी उपाय म्हणून जलस्त्रोताचे बळकटीकरणासाठी मृदसंधारण व जलसंधारणासाठी गावात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम यशस्वीपणे राबविणे मनरेगा योजनेतून कामे करता येतील. त्यातुन रोजगाराचा प्रश्न सुटेल व खेड्यातील लोकांचे स्थलांतरही थांबेल.

७. पाण्याचे संवर्धन, व्यवस्थापन, वितरण व्यवस्था, पारंपरीक आणि अपारंपारिक स्त्रोताची जपवणूक आणि पाण्याचा पुनर्वापर यासाठी लोकांमध्ये जलसाक्षरता महत्त्वाची आहे. पाण्याचे पुनर्भरण ही काळाची गरज आहे. त्याचप्रमाणे पाणी अंकेक्षण ही संकल्पना रूढ झाली पाहीजे.

जे मजूर लाकूडतोड करतात त्यांच्यासाठी झाडे लावण्यासाठी खड्डे खोदणे, रोपे लावणे याची कामे दिलीतर त्याचा प्रश्न सुटेल हीच झाडे मोठी झाली तर कोतवाली योजना राबवावी या परिसरात राहणाऱ्या कामगाराने ज्यांनी जंगल राखले आहे त्यांच्याकडून बांबू विकत घेणे व त्याच्या वेगवेगळ्या वस्तू तयार करून विकणे म्हणजे काम मिळते. उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटू शकतो.

**समारोप :**

पाणी हे संसाधन निसर्गाने मानवाला विनामूल्य दिलेली देणगी आहे. पाणी वापर नियोजनाचा अभाव व बेसुमार उपसा झाल्यामुळे दुष्काळासारखी आपत्ती आली आहे. दुष्काळ या संकटाचा सामना करताना सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे. सरकार, स्वंयसेवीसंस्था, व्यक्तीच्या सहकार्यातून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. सरकार दुष्काळग्रस्त भागासाठी पॅकेज जाहीर करून विविध योजनांमार्फत पैसा खर्च करत आहे. केवळ तात्पुरते उपाय नको आहेत. शाश्वत व कायमस्वरूपाच्या उपाययोजना राबवल्या पाहीजेत, तरच या प्रश्नावर आपण मात करू शकू.

**संदर्भसुची :**

१. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - २०१५-१६ पृ.क्र. १०
२. दैनिक लोकसत्ता - १२ एप्रील २०१६
३. सकाळ ॲग्रोवन - २४ फेब्रुवारी, २६ फेब्रुवारी व २१ एप्रिल २०१३
४. बुलेटिन ऑफ युनिक ॲकॅडमी, पुणे - सप्टेंबर २०१४ पृ.क्र.३६,३७,३८
५. योजना, मार्च - २०००, एप्रिल २०१४, पृ.क्र. २०,४०
६. अर्थसंवाद - ऑक्टोबर - डिसेंबर २०१३ पृ.क्र. १७८,१७९

* * *

Solapur Zilla Samajseva Mandal's

# SANTOSH BHIMRAO PATIL ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, MANDRUP

(Accredited 'B' grade by NAAC)

Solapur University, Solapur Sponsored

**National Seminar**

On

## "Indian Agricultural Development after Globalization"

**On Saturday, 18/02/2017**

**Organized by**

**Department of Geography and Department of Economics**

# Certificate

This is to certify that, Mr./Ms./Mrs./Dr./Prof. M. K. Nannaware of Shivaji Art, Comm & Science College (Akot Dist Akola) has participated / presented a paper entitled भारतातील शाश्वत कृषीचा विकास in the national seminar.

Mr. D.K. Dede
Co-Coordinator

Dr. S.N. Kadam
Coordinator

Principal Dr. B. M. Bhanje
Convener

# भारतातील शाश्वत कृषीचा विकास

**प्रा. एम के. नन्नावरे,** *अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट*

**सारांश :**

परिसराचा, परिसंस्थेचा ऱ्हास करून साध्य केलेल्या विकासामुळे, निर्माण केलेल्या वर्चस्वामुळे शाश्वततेचा बळी जातो, हा निसर्गाचा नियम आहे. तो आधुनिक शेतीलाही लागू पडतो. संसाधनांची प्रचंड भूक असलेली ही शेती दिर्घ काळाचा विचार करता शाश्वत ठरू शकत नाही. भारतात आणि जगभरात या विषयावर विचारमंथन सुरू आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने सस्टेनेबल डेव्हलपमेन्ट गोल्स (एसडीजी) निश्चित करताना शाश्वतकृषी विकासावर भर दिला आहे. त्यात प्रामुख्याने पर्यावरणाच्या संरक्षणाचा विचार आहे. त्यामध्ये पर्यावरणपुरक शेती पद्धती, परिसरातील जैवविविधता आणि जंगलाचे संवर्धन, वृक्षतोडीवर निर्बंध याचबरोबरीने सुपीक जमिनीची धूप रोखण या बाबी महत्त्वाच्या आहेत. हे साध्य करण्यासाठी पारंपारिक शेतीविज्ञान, पर्यावरणपूरक पीकव्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा लागणार आहे. त्यासाठी उर्जा, कार्बन आणि पाण्याच्या सुयोग्य वापरावर भर द्यावा लागेल. त्यातूनच शाश्वत शेतीची संकल्पना पुढे आली. शाश्वतशेती ही नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणारी पर्यावरणाची गुणवत्ता अबाधित ठेवणारी आणि शेतकऱ्यांना स्थैर्य देणारी शेती पद्धती आहे.

**प्रस्तावणा :**

आपल्या पृथ्वीच वय आहे सुमारे साडेचार अब्ज वर्ष. साधारण बारा हजार वर्षांपूर्वी मानवाने शेतीला सुरूवात केली. पण ती प्राथमीक स्वरूपाची होती. साधारण आठ हजार वर्षांपूर्वी खऱ्या अर्थाने नियोजित शेतीला सुरूवात झाली. पुरेसं अन्नधान्य आणि जनावरांच्यासाठी चाऱ्याचा प्रश्न सोडविणे यावर मुख्य भर होता. त्यातून टप्याटप्याने आधुनिक शेती आणि पशुपालनात सुरूवात झाली. अन्नधान्याची मागणी वाढू लागली तशी मोठ्या प्रमाणात जमिनी लागवडीखाली येऊ लागल्या. पूरक व्यवसायाची गती वाढू लागली. परंतु गेल्या पन्नास वर्षात पुन्हा एकदा शेती व्यवस्थापन आणि पशुपालनाची नव्याने मांडणी करण्याचा विचार सुरु झाला आहे. आधुनिक शेतीपद्धतीच्या कामी मोठे यश आले. परंतु या शेतीपद्धतीस रासायनिक खते आणि कीडनाशकांचा खूप मोठ्या प्रमाणावर वापर केल्या जातो. त्यामुळे नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास आणि पर्यावरणाचे अपरिमित नुकसान होत आहे. शिवाय पिकांच्या जैवविविधतेलाच नख लागते आहे.

**शाश्वत शेतीची संकल्पना :**

शाश्वत शेतीच्या संकल्पनेबाबत अनेक धारणा आहेत. बऱ्याच वेळा शाश्वत शेती आणि सेंद्रिय शेती एकच आहेत, अशी मांडणी केली जाते. वास्तविक ती चुकीची आहे. सेंद्रिय शेतीमध्ये रासायनिक खते आणि किडनाशकांना संपूर्ण फाटा दिलेला असतो. त्यांचा अजिबात वापर केला जात नाही. परंतु शाश्वतशेती याबाबतीत लवचीक आहे. माती आणि पर्यावरणावर विपरीत परिणाम होणार नाही, इतक्या मर्यादीत प्रमाणात त्याचा वापर करण्यास शाश्वतशेतीमध्ये आडकाठी नाही. या निविष्ठांचा आवश्यकतेनुसार, गरजे इतकाच आणि अतिशय विवेकाने वापर करावा, अशी शाश्वत शेतीची भूमिका आहे. म्हणजे शाश्वत शेती ही अधिक व्यापक संकल्पना आहे. काटेकोर शेती, निसर्ग शेती, नैसर्गिक शेती, किफायतशीर शेती, संवर्धित शेती, एकात्मिक शेती या सगळ्या शेतीपद्धतीचा समावेश शाश्वत शेतीमध्ये करता येऊ शकतो. थोडक्यात नैसर्गिक संसाधनाचे जतन, पर्यावरणाची गुणवत्ता अबाधित ठेवणे, बदलत्या मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी, संसाधनाचा सुयोग्य वापर करून केलेली शेती म्हणजे शाश्वत शेती होय.

**समृध्द जनुकसाठा धोक्यात :**

शाश्वत शेती ही काळाची गरज आहे. कारण रासायनिक खते आणि किडनाशकांची वाढती भूक असणाऱ्या आधुनिक शेतीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. रासायनिक शेतीमध्ये जास्त उत्पादन देणाऱ्या ठराविक संकरित जातीनाच प्राधान्य दिले जाते. त्यामुळे देशी वाण संपुष्ठात येत आहेत. रासायनिक शेतीमुळे देशी वाणांवर आलेली कुऱ्हाड निसर्गातील समृध्द जनुकीय साठ्याचा ऱ्हास करणारी आहे. वास्तविक निसर्गात पिकांच्या विविध जातीची ही समृध्दी निर्माण होण्यासाठी शेकडो वर्षांचा कालावधी जावा लागला आहे. आपण शेतीपद्धती बदलल्यामुळे हा समृद्ध ठेवा नष्ट झाला तर तो पुन्हा अस्तित्वात येण्यासाठी खूप प्रदीर्घ कालावधी लागेल.

**माती आणि पाणी :**

रासायनिक शेतीमुळे झालेले दुसरे मोठे नुकसान म्हणजे मातीची धूप. खतांचा अतिरेकी वापर झाल्यामुळे मातीच्या कणांनी रचना विस्कळीत झाली आहे. परिणामी, पाणी आणि वारा यामुळे मातीचा वरचा थर हळूच वाहून जाण्याची प्रक्रिया होते. युरियासारख्या नत्रयुक्त खतांचा बेमाप वापर होत असल्यामुळे जमिनीतील आम्लांचे प्रमाण वाढत आहे. यामुळे जिवाणूंची क्रिया मंदावते. तणांची संख्या आणि


(ISBN – 978-93-86013-43-9)

किडीचा हल्ला वाढतो. पाण्याचा मोकाट वापर केल्यामुळे पाणी जमिनीत साचून राहू लागले, तसेच जमिनी - क्षारपड होण्याचे प्रमाण वाढले. जमिनीच्या पोटातून पाण्याचा अनियंत्रित उपसा सुरू असल्यामुळे भूजलपातळी खालावली आहे. जंगले झपाट्याने आकुंचन पावत आहेत. त्याचा परिणाम जागतिक तापमानवाढ, जैवविविधतेचा ऱ्हास, दुष्काळ आणि जलप्रकल्पांमध्ये गाळाचे वाढलेले प्रमाण या समस्यांनी आपला विळखा घट्ट केला आहे.

**शाश्वत शेती व्यवस्थापन पध्दती :**

रासायनिक शेतीपेक्षा शाश्वतशेतीच्या व्यवस्थापन पद्धती वेगळया आहेत. पीक जैवविविधतेचे जतन, पाणलोट व्यवस्थापन, पाण्याचा कार्यक्षम वापर, एकात्मिक खत व्यवस्थापन, एकात्मिक पीक संरक्षण आणि पीक बदल या गोष्टींचा त्यात समावेश होतो. जमिनीची सुपीकता कायम राखणे आणि तिचे संवर्धन करणे या बाबीला शाश्वत शेतीमध्ये अत्यंत महत्वाचे स्थान आहे. नैसर्गिक संसाधने - पर्यावरण - जैवविविधता यांचे जतन करण्यासाठी, पोषकद्रव्यांनी युक्त अन्नधान्य उत्पादनासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक - मानसिक - सामाजिक स्थैर्य देण्यासाठी शाश्वत शेती ही काळाची गरज आहे.

**परस्परविरोधी प्रवाह :**

वाढत्या अन्नधान्यांच्या मागणीमुळे जंगलतोड होऊन जास्तीत जास्त जमिनी लागवडीखाली आणण्याची स्पर्धा सुरू झाली. परंतु हे जंगल परिसरातील आर्द्रता, जमिनीतोड, पाणीसाठा राखून ठेवण्यासाठी आणि जमिनीची धूप थांबविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. याचा आपल्याला विसर पडत चालला आहे. जंगल हे जैवविविधतचे भांडार असते. त्याच्यावर घाला आला आहे. शेती आणि पर्यावरणाच्या दृष्टीने हे धोकादायक आहे मानवी हस्तक्षेपामुळे हरितगृह वायूंचा देखील वाढ होत आहे. घटलेले पाऊसमान, सुपीक जमिनीचा नाश, पाण्याची कमतरता, वाढते तापमान आणि हवेतील ऑक्सीजन, नायट्रोयन आणि कार्बनडायऑक्साईडच्या प्रमाणात झालेला बदल ही सगळी त्याचीच लक्षणे आहेत. त्याचा थेट परिणाम वनस्पती, मानवी जीवन आणि पशुपक्ष्यांवर होताना दिसतोय.

**अन्न सुरक्षा :**

शाश्वत विकासाची आखणी करताना, पहिल्या टप्प्यात उपासमार संपवणे, अन्नसुरक्षा, प्रत्येकला पौष्टिक अन्नधान्यांची उपलब्धता यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. सन २०३० पर्यन्त जगाच्या लोकसंख्येत आणखी १.२ अब्ज लोकांची भर पडेल आणि ती ८.५ अब्जांवर पोचण्याचा अंदाज आहे. औद्योगिक विकास आणि पीकलागवड क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टिने आत्तापर्यन्त जंगलांची मोठ्या प्रमाणावर तोड होत होती, परंतु गेल्या काही वर्षात काही देशांनी जंगलतोडीवर नियंत्रण मिळवीले आहे. तरी देखील जगाचा विचार करता दरवर्षी जर्मनी या देशाच्या क्षेत्राफळाइतक्या जमिनीवरील जंगलाचे नुकसान होत आहे त्यामूळे या मुद्यांवर जागृती करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण विकास कार्यक्रम आणि अन्न व कृषी संघटनेने जगभरात विशेष मोहीम राबविण्यास सुरूवात केली आहे. 'विचार करा, खा, वाचवा' हे या मोहिमेचे नाव आहे. या मोहिमेच्या माध्यमातून ग्राहक, किरकोळ विक्रेते, व्यावसायिक आणि हॉटेल व्यावसायिकांच्यामध्ये अन्न नासाडी कमी करण्याबाबत जागृती आणण्यात येत आहे.

**शाश्वत कृषी विकास :**

शाश्वत कृषी विकासाच्या उदिष्टांनुसार प्रामुख्याने पर्यावरणाच्या संरक्षणावर भर दिलेला आहे. आफ्रिका खंडातील शेतीत खतांची कमतरता आहे, तर दुसऱ्या बाजूला विकसित आणि विकसनशील देशांमध्ये अतिरिक्त खतांच्या वापरामुळे जमिनीची सुपीकता पीक उत्पादन आणि गुणवत्तेवर विपरीत परिणम होत आहे. भारतातही शिफारशीपेक्षा अधिक रासायनिक खतांचा वापर होत असल्याने समस्या निर्माण झ ल्या असून त्याचा थेट परिणाम अन्नसुरक्षेवर होत आहे. पृथ्वीवरील वास्तव्यास योग्य असलेली २५% जमीन आणि ७०% गोडे पाणी अन्नधान्य उत्पादनासाठी वापरले जाते. शेतीसाठी ८० % जगलांचे नुकसान झाले आहे, तर अन्नधान्य उत्पादनामुळे ३०% हरितगृह वायूंचे उत्सर्जन होत आहे. याकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे लागणार आहे. येत्या काळात पर्यावरणाला धोका न पोहोचविता पीक उत्पादन, शेतकऱ्यांना परवडेल अशी व्यवस्थापन पद्धती आणि ग्राहकांची मागणी पुरवणाऱ्या पर्यावरणपुरक साखळीची गरज आहे. म्हणजेच आर्थिकदृष्ट्या परवडणारी, निसर्गपुरक आणि समाजासाठी उपयुक्त अशी शेती व्यवस्थापन पद्धती अंगीकारणे आता गरजेचे आहे.

**जागतिक पातळीवरील प्रगती :**

जगातील २२ देशांनी शाश्वत शेती धोरण आणि शाश्वत विकास उदिष्टांच्या प्रगतीचा अहवाल संयुक्त राष्ट्र संघाकडे सोपविला. त्याचा आढावा जुलै २०१६ मध्ये घेण्यात आला. त्यानुसार आशियाई देशांपैकी चीन, फिलिपीन्स, कोरिया या देशांनी शाश्वत विकसाच्या दृष्टीने चांगली पावले टाकायला सुरूवात केली आहे. चीनमध्ये गेल्या काही वर्षात मांसाहाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पुढील काही वर्षात त्यामध्ये किमान ५० % घट होण्यासाठी चीन सरकार प्रयत्न करीत आहे. यामुळे सन २०३० पर्यन्त चीनमधील पशुपालन उद्योग क्षेत्रातून $CO_2$ सममूल्य उत्सर्जन किमान एक अब्ज टनांनी कमी होईल असा अंदाज आहे. एफएओ ने अफगानिस्तान, बांग्लादेश,


(ISBN - 978-93-86013-43-9)

भुतान, भारत, मालदीव, नेपाल, पाकीस्तान, श्रीलंका या देशामध्ये काढणी पश्चात तंत्रज्ञानाच्या वापराविषयी जागृती करण्यावर भर दिला आहे. त्यामध्ये अन्नधान्याची गुणवत्ता, सुरक्षा आणि फळे व भाजीपाल्याच्या वितरणप्रणालीत सुधारणा यावर भर दिलेला आहे. मॉरिशस या देशाने मत्स्यशेती, वनसंवर्धन आणि शेती विकासामध्ये चांगली कामगिरी केली आहे. भारत मात्र अजूनही शाश्वतविकासच्या उद्दिष्टामधील शेतीविषयक धोरणाबाबत उदासीन आणि पिछाडीवर आहे.

सुचना :

- उपलब्ध साधनसामग्रींचा योग्य वापर करणे.
- नैसर्गिक परिसंस्थाचे संवर्धन संरक्षण आणि त्यांच्या वाढीसाठी प्रयत्न करणे.
- परिसंस्थांच्या विकासामध्ये लोकांचा थेट सहभाग वाढविणे.
- ग्रामीण पातळीवरील लोकांचा सामाजिक स्तर उंचावण्याचे प्रयत्न करणे.
- पर्यावरणाच्या रक्षणासाठी नैसर्गिक आणि मानवी यंत्रणामधील चांगला कार्यान्वयाचा अवलंब करणे.

**समारोप :**

भारतीय शेतीचा विचार करता शेती व्यवस्थापनातील अडचणी, पायाभूत सुविधांचा अभाव या महत्त्वाच्या अडचणी आहेत. एका बाजूला कुपोषण आणि दुसऱ्या बाजूला अन्नधान्याची नासाडी हे चित्र बदलणे आवश्यक आहे. दूध आणि साखरेच्या उत्पादनात आपण आघाडीवर आहोत. भाजीपाला आणि फळांच्या उत्पादनात आपला दुसरा क्रमांक आहे. दुसऱ्या बाजूला देशातले सुमारे चाळीस कोटी लोक गरिबीरेषेखाली आहेत. पाच वर्षाखालील मुलांपैकी जवळपास निम्मे मुले कुपोषित आहेत. हा विरोधाभास आणि विषमतेचे चित्र बदलायचे असेल, तर त्यासाठी शाश्वत शेतीचा विचार करण्याशिवाय तरणोपाय नाही.

**संदर्भसूची :**

१) सकाळ ॲग्रोवन, पुणे - दिवाळी २०१६
२) दै. वर्तमानपत्रे - सकाळ, लोकसत्ता
३) बुलेटिन ऑफ युनिक ॲकॅडमी, पुणे नोव्हे - २०१५, ऑगष्ट - २०१६
४) भारतीय अर्थव्यवस्था - रूद्रदत्त सुंदरम
५) भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास - प्रा. डॉ. एन. एल. चव्हाण.

 (ISBN – 978-93-86013-43-9)

विद्यासागर शिक्षण संस्था रामटेक द्वारा संचालित

## विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (बिजेवाड़ा) रामटेक.

द्वारा आयोजित

# विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद

४१ वे वार्षिक अधिवेशन २०१७

## प्रमाणपत्र

प्रा. डॉ. एम. के. नन्नावरे

महाविद्यालय श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महा. अकोट जि. अकोला यांनी

दिनांक ४ व ५ मार्च २०१७ ला विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (बिजेवाड़ा) रामटेक द्वारा आयोजित विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेच्या ४१ वे वार्षिक अधिवेशनात सहभाग घेतला, तसेच विदर्भातील नैसर्गिक साधनसंपत्तीचे अर्थशास्त्र या विषयावर शोध निबंध सादर केला/चर्चासत्रात भाग घेतला.

त्याबद्दल सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. एच. आर. तिवारी | डॉ. अंजली कुळकर्णी | डॉ. पि.के.यू.पिल्लई | प्रा.डॉ. संगीता जी. टक्कामोरे |
| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | प्राचार्य | स्थानिक सचिव |
| ४१ वे वार्षिक अधिवेशन विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद रामटेक | विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद रामटेक | विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (बिजेवाडा), रामटेक | अर्थशास्त्र विभाग प्रमुख विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (बिजेवाडा), रामटेक. |

# ONE DAY STATE LEVEL INTERDISCIPLINARY SEMINAR

Organized by

***Departments of Economics, History and Political Science***

# ARTS AND COMMERCE COLLEGE, BHISI

(RUN BY CHIMUR SAMAJONNATI BAHUDDESHIYA SANSTHA, CHIMUR)

**TH : CHIMUR, DIST: CHANDRAPUR (MS) - 442903**

## Certificate

This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs. Moreshwar K. Nannaware Shri Shivaji Arts, Comm. & Sci. College, Akot participated and presented a paper Relevance of Gandhi's Ideal of Self-Sufficient Village Economy in one day interdisciplinary seminar on **ECONOMIC AND POLITICAL THOUGHTS OF MAHATMA GANDHI** on March 27, 2017.

| | | | |
|---|---|---|---|
| Co-ordinator | Organizing Secretary | Organizing President | Organizer |
| **Dr. Dinkar Chaudhari** | **Dr. Natthu Girde** | **Dr. Vitthal Thawari** | **Dr. Rajendra Jane** |
| (Head, Dept of Political Sci.) | (Head, Dept. of History) | (Head, Dept. of Economics) | Principal |

 ISBN-978-93-82962-61-8

# RELEVANCE OF GANDHI`S IDEAL OF SELF-SUFFICIENT VILLAGE ECONOMY

❑ **M.K. Nannaware**
Assist. Prof. & head Dept. of Economics
Shri Shivaji Arts, Commerce
and Science College, Akot.

**INTRODUCTION :**

Economic Development of a county depends on the proper utilization of resources India, at the time of her independence, had an economy with a low level of economic and technological development, low per capital income, slow pace of development of economic and social institutions and outdated methods of production techniques. Our objective then ws to attain and accelerate the economic development of the country. At the time while lIndia started formulating planning strategies in 1951-52 there was debate on India`s development problems. He also viewed planning as a way of avoiding the unnecessary rigorous industrial transition. He believed that this way would affect the people living in the rural areas. Gandhian approach has always said about the voluntary wants, the need for self0suficient village communities and the issues relating to better balance between man and nature. He was interested in the growth of human beings and more significantly the growth of the deprived and underprivileged group of people. According to him, an increase in personal income is an indication of the growth of national income. But the opposite may not be true i.e. the growth of national income may not always benefit every man in society.

**Gandhi`s Understanding of the Indian Conditions:**

Gandhi came back to India after his successful South African initiative to find the Indian economy in a state of absolute disarray. He was pained by the way the rural economy was broken down and debased beyond redemption by the British authorities. First, he had to instill in India the moral courage to be economically self-sufficient, producing and fulfilling its own primary needs in home-grown, indigenous ways. This would not only revive the rural economy of India, it would also break down the British economic motives that led them to stay in India. Gandhi had only one way out and he immediately embarked on that. He turned his life into a living example of his ideals land led every resident of his Sabarmati ashram to do the same. Soon, the ideals of economic self-sufficiency were accepted throughout India.

**Gandhi`s Ideal of Self-Sufficient Village Economy :**

Naturally the development of the country depends on the development of villages. All the goods and services necessary for the village members should be grown within the village. In a word, every village should be a self-contained republic. If every village distributes its surplus produce to the poor villagers the problems of poverty and starvation in the rural areas would be solved. Agricultural sector alone cannot solve the problem of rural poverty land unemployment. That`s why Gandhi gives importance on the growth of the rural industries like khadi, handlooms, sericulture and handicrafts. He opines that large-scale industries make people lazy and help concentration of wealth in the hands of few. On the contrary, rural industries are based on family labour and required less amount of capital. Raw materials are also collected from local markets and the goods thus produced are sold liln lthe local markets. Therefore, there is no problem of production and market. Large scale capital-intensive production, displaces labour and naturally augments employment and under-employment. Machinery creates a Pareto optimum situation in the sense that it improves the economic conditions of a few at the cost of many unfortunate rural people leaving them unemployed and exploited.

7 Criteria to Test Performance of Gandhi`s System.

**These are :**

1. Eradication of poverty and minimization of affluence.
2. Self-sufficiency of every unit in basic needs.
3. Identification of human needs and their fulfillment.
4. Agro-centric economy as the basis to create economy of permanence.

 ISBN-978-93-82962-61-8

5. Need-based production as far as possible through small-scale units.
6. Check on distortions through basic education and skill formation, and
7. Curtailment of concentration of economic power.

The value-judgment of Gandhian system is quite clear. Here the criteria of performance are different from mainstream criteria. In Gandhian criteria, what is produced is to be judged along with how it is produced. Its buoyancy depends upon restructuring the rural economy.

Gandhi is one of the pioneers of interdisciplinary approach to economics. In his thought economics cannot be separated from health, land health cannot be separated from

sanitation, and sanitation cannot be isolated from nutritious food, etc. Those who call themselves pragmatic feel that there is an overtone of idealism in Gandhi. So, it is thought, that his system has a doubtful applicability. His hypothesis is never tested. There is a tendency to reject it without verification. The fact is the present system of economy is dominated by vested interests. Whether Gandhi's ideas will be accepted or rejected largely depends on availability of raw material. To call Gandhian economy an ideal system is to ignore what is real. Reality changes with the necessity of life. Without entering into a philosophical polemics, it can be said, reality is not always real. The permission of global competitive economy generates optimism of Gandhian economy.

**Relevance of Gandhi's Economic Ideas :**

The overall progress of the entire economy depends on the balanced development of all the regions. In India there exists a huge regional disparity. In relative terms some states are advanced economically land some other states are backward. Even within a state some districts are more backward than the rest. In West Bengal, for example, the northern part of the state popularly known as 'North Bengal' comprising six districts are relatively backward than the 'South Bengal' districts in terms of productivity in agriculture, industry, educational development, health lfacilities, etc. Even within the South Bengal region of West Bengal state there are some districts like Purulia, Bankura etc. which are under developed if we compare them with some districts like Burdwan, and Hughly. In this context Gandhian economics, is relevant which supports the attainment of self-sufficiency level of industrialization or uniform economic pattern for each region. The Gandhian economics is of the view that every man should increase his personal income and standard of living by exploiting the existing natural and human resources fully eco-friendly.

Gandhi's dream of expanding village industries, industrial policy resolutions of 1948, 1956 and 1977 have offered a special favour for the development of small scale and village industries. The village and small-scale industries have been playing an important role in Indian economy in terms of employment generation and poverty alleviation. This is due to fact that these industries are labour-intensive and capital saving. The total employment created by these industries, for example were 3970000 in 1973-74. This rose to 12980000 in 1991-92. According to Economic Survey, 2000-2001 the estimated employment of the cottage and small-scale sector again rose to 17850000. The growth rate of this sector during 1991-92 to 1999-2000 was around 4 per cent. This sector' contribution towards exports during the same period in value term has increased from Rs.9,100 crore to Rs. 36,470 crores. This shows a growth rate of over 300 per cent. In the post-reform period khadi and village industries play an important part in providing employment opportunities to disadvantaged group of people. These industries have spread in about 250000 villages out of total 581000 villages of India in 1997-98. In order to be more competitive in the world market the Khadi and Village Industries Commission has introduced Khadi denim jeans and Sarvodaya brand. Thee are eco-friendly and bio-degradable natural products and have high demand in the world market. Mechanization in agriculture has increased productivity but at the same time reduced employment opportunity.

The Gandhian view of self-sufficient village economy is also relevant in the context of reducing poverty and unemployment in rural India. In 1972-73] 54.1 per cent people lived below the poverty line in rural India. This slightly decreased to 51.2 per cent in 1977-78. In 1983-84 it again fell down to 45.7 per cent. In 1993-94 this rate again came down to 37.3 per cent. In 1999-2000 it was roughly 30 per cent. The data presented here about poverty in rural India have been gathered from various issues of Economic Survey and Planning Commission. Although the ratio of poverty has been declining, roughly one-third of the rural people still live in abject poverty. In order to improve the conditions of the rural poor it is necessary to expand rural industries further at a

 ISBN-978-93-82962-61-8

rapid rate. At the same time it is essential to review seriously the rural anti-poverty programmes in the light of lapses noticed land in the context of formulating the tenth five year plan (2002-2007)

**Conclusions**

Gandhi is of the view that full employment of human resources is the basic need of a country. It is true that national income will increase if each and every persons (whether skilled or unskilled) is employed fully. This cannot be possible only with the development of large-scale industries because of their labour-saving nature. Therefore mechanization and large scale production cannot provide the solution to the problem of poverty and unemployment. Self-sufficient village economy is an alternative solution and in this context the role of institutions in the rural sector like the village panchayat and rural multipurpose co-operative can play a vital role.

**References :**


1. http://en.wikipedia.org/wiki/Gandhian economics.
2. Http://www.gandhi-manibhavan.org/gandhiphilosophy/philosoph-economics ideals.htm.
3. http://gandhifoundation.org/2009/08/30/Gandhi-on-economics/
4. http://caravan.squat,net/ICC-en/krrs-en/ghandi-econ-en.htm.
5. http://www.indianfolklore.org/journals/index.php/Ish/article/ download/581/694
6. http://www.vedamsbooks.in/no60969/economics-mahatma-gandhi-challenges-development-anil-kumar thakur-mithilesh-sinha
7. http://www.mkgandhi.org/g relevance/chap16.htm.
8. http://www.mkgandhi.in/articles/gandhi economist.htm.


★★★

## Kautilya Dnyan Prabhodhini, Amravati

**ICSSR Sponsored Two Day National Seminar on**

# 25 Years of Human Development Report : Concept, Issues & Challenges

# Certificate

This is to certify that Dr./Prof. M. K. NANNAWARE

College SHRI SHIVAJI ARTS, COMM. & SCI. COLLEGE, AKOT.

has attended the two day National Seminar organised by Kautilya Dnyan Prabhodhini at Amravati during 18th & 19th August 2017. He / She has also presented the paper titled as विदर्भातील मानव विकासाच्या निर्धारक घटकांचे अध्ययन.

during the technical session of National Seminar.

| | | |
|---|---|---|
| **Dr. Vanita Chore** | **Dr. Prashant Haramkar** | **Dr. D. V. Jahagirdar** |
| *Co - Convener* | *Secretary* | *President & Convener* |

ISBN 978-81-921694-8-4

# 25 Years of Human Development Report : Concept, Issues and Challenges



Editors

Dr. Prashant Haramkar
Dr. Jairam Gaikwad
Dr. Vanita Chore
Dr. Rajshree Raibhog

Kautilya Dnyan Prabhodhini, Amravati.

# विदर्भातील मानव विकासाच्या निर्धारक घटकांचे अध्ययन

**एम. के. नन्नावरे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, अकोट जि.अकोला.

१९५० च्या दशकापासून विकसनशील व अविकसीत देशांमध्ये विकासाच्या संदर्भात विचार सुरू झाला. यामध्ये शुल्टझ, लेविस या अर्थशास्त्रज्ञांनी विकासाच्या संदर्भात विशेष योगदान दिले. त्यात अमर्त्य सेन यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. १९८० पर्यन्त एखाद्या देशाची विकासाची स्थिती स्थूल राष्ट्रीय उत्पन्नावरून स्पष्ट होत होती, याचा अर्थ राष्ट्रीय उत्पन्न हे विकास मोजण्याचे निर्देशक (Indicator) म्हणून जगात मोठ्या प्रमाणात वापरले गेले. आर्थिक विकास ही एक दीर्घकालीन प्रक्रिया असून ती वास्तविक उत्पन्नाशी संबंधित आहे असे मानले जात असे. अलिकडच्या काळात आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी सकल राष्ट्रीय उत्पादनाऐवजी मानव विकास निर्देशांकाला आधिक महत्त्व देण्यात येत आहे. मानव विकास हा प्रत्यक्षपणे व्यक्तीगत घटकांच्या सामाजिक, आर्थिक निर्देशाकांशी निगडीत् आहे आणि व्यक्तीगत घटकांच्या नियोजनात त्याला अत्यंत महत्त्व आहे. समाजातील प्रत्येक घटकाला आरोग्यपूर्ण, समृध्द आणि चांगल्या जीवनमानाची अपेक्षा असते किंबहुना त्यांचा तो अधिकार असावा त्या अनुशंगाने संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) ने मानव विकासाला मानवासमोरील पर्यायांच्या विस्ताराच्या स्वरुपात परिभाषित केले.

प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश मानव विकास निर्देशांक हा प्रतिव्यक्ती उत्पन्न, साक्षरता दर, सरासरी आयुर्मान इत्यादी प्रमुख घटकांसोबतच, प्रजननदर, मृत्युदर, बालमृत्यू दर, लिंग गुणोत्तर व कार्यकारी लोकसंख्येचे प्रमाण या सहाय्यक घटकांनुसार निर्धारीत होतो. त्यांचा विदर्भातील प्रगत व मागास जिल्हे यांच्या मानव विकासावरील परिणामांचे मापन करणे व त्या निर्धारकांचा परस्परावरील प्रभावाचे अध्ययन करणे हा आहे. जेणे करून प्रगत आणि मागास जिल्ह्यांच्या मानव विकासावरील अंतर कमी करण्यासाठी योग्य व्यूहनीतीवर आधारीत धोरण ठरविण्याला साहाय्य होईल प्रस्तुत अध्ययन विविध शासकीय अहवाल व प्रकाशने तसेच इतर स्रोतांपासून संकलीत केलेल्या व्दितीयक सामग्रीवर अधारीत आहे.

**मानव विकास संकल्पना व पार्श्वभुमी :**

UNDP अंतर्गत मेहबूब उल-हक यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली १९९० मध्ये पहिला मानव विकास अहवाल तयार करून प्रकाशित करण्यात आला त्यामध्ये सर्वप्रथम मानव विकास निर्देशाकांची संकल्पना जगासमोर मांडण्यात आली. मानवी निवडीशी संबंधी मुलभूत तीन पैलू दिर्घ व निरोगी आयुष्य, ज्ञान विस्तृत करण्याची इच्छा व योग्य जीवनमान जे विकासाच्या सर्वच स्तरांवर स्वीकार्य आहे याचा मानव विकास निर्देशांकात समावेश करण्यात आला.

शिक्षण, आरोग्य व उपजिविकेचे र ान चा जीवनाच्या तीन महत्वपूर्ण पैलुसाठी दिलेला लढा व त्याची प्रत्यक्षात झालेली पूर्तता यांचा संयोग म्हणजे मानव विकास होय. थोडक्यात उपलब्ध संधीचा विस्तार करण्याची प्रक्रिया म्हणजे मावन विकास होय.

निवडीची कक्षा विस्तारीत करणे व मानवाचे कल्याण साध्य करणे यांची सांगड म्हणजे मानव विकास. मानव विकास ही संकल्पना मूलभूत गरजांची पूर्तता करण्याच्या संदर्भातील विचार प्रक्रिया होय असे रॉबिन्सन, क्रुगर, मॅकलेलण्ड इत्यादी अभ्यासकांनी देशाच्या आर्थिक विकासाची प्रक्रिया भौतिक संसाधनाच्या संपन्नतेबरोबरच मानवी संसाधनाव्दारे प्रभावित होते असा निष्कर्ष काढला. १९९० पासून णछऊझ व्दारे प्रकाशित मानव विकास अहवालामधून मानवाला केन्द्रबिन्दू मानून विकासाला चालना देण्यास सुरूवात झाली. मानव विकास अहवाल हे जागतिक पातळीवर विविध देशांची आर्थिक सामाजिक स्थिती तुलणात्मक रित्या मांडतात व त्यातूनच देशांच्या विकास प्रक्रियेला गती देण्याची चालणा मिळते. म्हणूनच राष्ट्रीय पातळीवर (२००१) व विविध राज्यपाळीवर व राज्यामार्फत (२००२) मानव विकास अहवाल प्रकाशित केले जातात.

**विदर्भातील जिल्हानिहाय मानव विकास :**

विदर्भाच्या सर्वांगीण विकासामध्ये मानव समूहाच्या विकासाला पूर्वीपासूनच प्राधान्य दिले गेल्याचे विदर्भाच्या इतिहासात आढळून येते. ममानव विकासफ हे विदर्भातील शासकीय व अशासकीय पातळीवर होणाऱ्या विविध प्रयत्न व परिश्रमाचा केन्द्रबिंदू असल्याचे दिसून येते. संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमानुसार दर्शविलेली मार्गदर्शक तत्वे व निकष वापरून महाराष्ट्र सरकारने ममानव विकास निर्देशांकफ या मापदंडाचा स्विकार करीत इ.स. २००२ व २०१२ मध्ये महाराष्ट्र मानव विकास अहवाल प्रकाशित केलेला आहे. या अहवालामधील मानव विकास निर्देशाकांच्या साहाय्याने विदर्भातील मानव विकासाची स्थिती दर्शविलेली आहे.मानव विकास अहवालात महाराष्ट्राचा २००२ व २०१२ मध्ये मानव विकास निर्देशांक अनुक्रमे ०.६६६ व ०.७५२ आहे. महाराष्ट्र भारतामध्ये सातव्या क्रमांकारवर आहे.

खालील सारणी क्र. १ वरून असे लक्षात येते की, विदर्भ व राज्याच्या मानव विकास निदशांकामध्ये फरक असल्याचे दिसून येते. त्यांचे प्रमुख कारण म्हणजे प्रतिव्यक्ती उत्पन्न, शिक्षण आणि आरोग्य इत्यादी बाबतीत विदर्भामध्ये राज्यापेक्षा बरीच कमतरता आहे. नागपूर जिल्ह्यामध्ये निर्धारक घटकांच्या विपुलतेमुळे मानव विकास निर्देशांक उंचावलेला दिसून येतो. नागपूर जिल्ह्यातील वाढते औद्योगीकरण, मध्य भारतातील प्रमुख व्यापारी केन्द्र उपलब्ध सिंचनसुविधा आणि शासकीय व खाजगी सेवाची मुबलकता इत्यादी वैशिष्ट्यांमुळे जिल्ह्याचा मानव विकास वृध्दिंगत झालेला दिसून येतो. उर्वरित जिल्ह्यात मानव विकासाच्या निर्धारण घटकांच्या साधारण परिस्थितीमुळे कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, निम्न राहणीमानाचा दर्जा इत्यादी प्रमुख समस्या दिसून येतात.

तक्ता क्र. १ : विदर्भातील जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक व दर्जा - २००१ व २०११

| अ. क्र. | जिल्हा | मानव विकास निर्देशांक २००१ | मानव विकास निर्देशांक दर्जा | जिल्हा | मानव विकास निर्देशांक २०११ | मानव विकास निर्देशांक दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | गडचिरोली | ०.५३८ | निम्न | गडचिरोली | ०.६०८ | निम्न |
| 2 | वाशिम | ०.५५४ | निम्न | वाशिम | ०.६४६ | निम्न |
| 3 | बुलडाणा | ०.५६७ | निम्न | बुलडाणा | ०.६८४ | निम्न |
| 4 | यवतमाळ | ०.५९२ | मध्यम | यवतमाळ | ०.७०० | मध्यम |
| 5 | गोंदिया | ०.६१७ | मध्यम | गोंदिया | ०.७०१ | मध्यम |
| 6 | भंडारा | ०.६२३ | मध्यम | भंडारा | ०.७०१ | मध्यम |
| 7 | अकोला | ०.६३१ | उच्च | अकोला | ०.७१८ | उच्च |
| 8 | अमरावती | ०.६३३ | उच्च | अमरावती | ०.७१८ | उच्च |
| 9 | वर्धा | ०.६३४ | उच्च | वर्धा | ०.७२२ | उच्च |
| 10 | चंद्रपूर | ०.६३७ | उच्च | चंद्रपूर | ०.७२३ | उच्च |
| 11 | नागपूर | ०.६९१ | अति उच्च | नागपूर | ०.७८६ | अति उच्च |
| 12 | विदर्भ | ०.६३० | | विदर्भ | ०.७२० | |
| | महाराष्ट्र | ०.६६६ | | महाराष्ट्र | ०.७५२ | |

स्रोत :- महाराष्ट्र मानव विकास अहवाल, २०१२ पा.क्र. १४

## विदर्भातील जिल्हानिहाय मानव विकास निर्धारक घटकाचे विश्लेषण :-

**१. प्रति व्यक्ती उत्पन्न :२००१-०२ व २०११ - १२** PCNDDP- (चालु किंमतीनुसार) ( रूपये )

| अ.क्र. | जिल्हा | वर्ष | |
|---|---|---|---|
| | | २००१-०२ | २०११-१२ |
| १ | अकोला | १७,०५१ | ६१,४२३ |
| २ | अमरावती | १७,७९५ | ६३,४६७ |
| ३ | भंडारा | १७,९०० | ६०,७६४ |
| ४ | बुलढाणा | १२,७५५ | ५०,७७२ |
| ५ | चंद्रपूर | २२,२९० | ७३,३२८ |
| ६ | गडचिरोली | १३,९४३ | ४८,३११ |
